सन २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेच्या दरम्यान आढळून आलेले इन-सॅनिटरी लॅटरिन्स (शौचालये) व त्यावर कार्यरत सफाई कामगारांचे सर्वेक्षण

**<u>महाराष्ट्र शासन</u>**

परिपत्रक क्र: सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२
दि.०४ मार्च, २०१३

**<u>परिपत्रक</u>**

सन २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेच्या दरम्यान महाराष्ट्रात २५६ शहरात एकूण १,७१,६८८ घरांमध्ये इन-सॅनिटरी लॅटरिन्स (शौचालये) आढळून आली आहेत. या इन-सॅनिटरी लॅटरिन्सचे सॅनिटरी लॅटरिन्समध्ये रुपांतर करुन इन-सॅनिटरी लॅटरिन्सचे पुर्णपणे निर्मुलन करणे, इन-सॅनिटरी लॅटरिन्सवर आढळून आलेले कार्यरत सफाई कामगारांचा शोध घेणे, आढळून आलेले सफाई कामगार व त्यांचे अवलंबित यांचे पर्यायी व्यवसायात पुनर्वसन करणे याबाबत भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांनी निर्णय घेतला आहे.

२. इन-सॅनिटरी लॅटरिन्स व त्यावरिल कार्यरत सफाई कामगार यांच्या सर्वेक्षणासाठी भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाने दि.१९/२/२०१३ ते २९/५/२०१३ या कालावधीत राष्ट्रीय स्तरावर मोहिम आयोजित केली आहे. सदर मोहिमेची राज्यस्तर, जिल्हास्तर व महानगरपालिका/ नगरपालिका/ कॅन्टोमेन्ट एरिया अशा विविध स्तरावर कार्यवाही करणे अपेक्षित आहे. याबाबतचे दिनांकनिहाय कार्यक्रम पत्रिका "परिशिष्ट-अ" म्हणून सोबत जोडण्यात येत आहे.

३. महाराष्ट्रात ज्या २५६ शहरात १,७१,६८८ घरांमध्ये इन-सॅनिटरी लॅटरिन्स (शौचालये) आढळून आली आहेत त्याबाबतचा तपशिल प्राप्त करण्यात आला असून आढळून आलेले इन सॅनिटरी लॅटरिन्स, शहराचे नाव, जिल्हयाचे नाव व इतर तपशिल याबाबतचे विवरणपत्र "परिशिष्ट -ब" म्हणून सोबत जोडण्यात येत आहे.

४. दि.१९/०२/२०१३ ते २९/०५/२०१३ या दरम्यान करण्यात येणाऱ्या इन-सॅनिटरी लॅटरिन्स तसेच त्यावर कार्यरत सफाई कामगार यांच्या सर्वेक्षणाबाबत भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाने "स्टॅटूटरी शहरातील सफाई कामगारांच्या सर्वेक्षणाबाबतची मार्गदर्शक तत्वे" कळविले असून त्याबाबतची पुस्तिका "परिशिष्ट —क" म्हणून सोबत जोडण्यात येत आहे. विविध स्तर समित्यांनी सर्वेक्षणाबाबत त्यांचे स्तरावर जनजागरण अभियान राबवावे, सर्वेक्षण केंद्रे निश्चित करुन त्यासाठी प्रगणक, डाटा ऑपरेटर, सुपरवायझर तसेच इतर आवश्यक कर्मचाऱ्यांची नेमणूक करावी. भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाने सर्वेक्षणाच्या

कामासाठी विहित केलेले नमुने आवश्यकतेनुसार समित्यांनी मुद्रित करुन घ्यावीत. महापालिका व नगरपालिका स्तर समितीप्रमुख यांनी सर्वेक्षणाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, सर्वेक्षणाचे कामात प्रगणक, डाटा ऑपरेटर, सुपरवायझर यांना दिशा दिग्दर्शन करावे व सर्वेक्षण विहित मुदतीत पूर्ण करावे.

५. सन २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेच्या दरम्यान आढळून आलेली इन-सॅनिटरी लॅटरिन्स (शौचालये) व त्यावरील कार्यरत सफाई कामगार याबाबतच्या सर्वेक्षणाच्या कामासाठी राज्यस्तर, जिल्हास्तर, महानगरपालिका व नगरपालिका यांच्या स्तरावर विविध समित्या गठीत करण्याबाबत भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाने सुचित केले आहे. अनुषंगाने, राज्यस्तर सर्वेक्षण समितीचा मसुदा "परिशिष्ट-ड-१", जिल्हास्तर सर्वेक्षण समितीचा मसुदा "परिशिष्ट-ड-२", जिल्हा दंडाधिकारीपेक्षा वरिष्ठ श्रेणीतील महापालिका आयुक्त असलेल्या शहरांसाठी सर्वेक्षण समितीचा मसुदा "परिशिष्ट-ड-३" मध्ये, जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या नगरपलिकेसाठी सर्वेक्षण समितीचा मसुदा "परिशिष्ट-ड-४",म्हणून सोबत जोडण्यात येत आहे तर जिल्हा मुख्यालया व्यतिरिक्त जिल्हयातील इतर शहरांसाठी असलेल्या सर्वेक्षण समितीचा मसुदा "परिशिष्ट-ड-५" म्हणून जोडण्यात येत आहे.

जिल्हा समितीबाबत "परिशिष्ट-ड-२", मध्ये विहीत केल्याप्रमाणे संबंधित जिल्हाधिकारी यांनी समिती गठित करावी. "परिशिष्ट-ड-३" मध्ये सुचित केल्याप्रमाणे महापालिका आयुक्त यांनी महापालिकास्तर समिती गठित करावी. "परिशिष्ट-ड-४", मध्ये विहीत केल्याप्रमाणे जिल्हाधिकारी यांनी नगरपालिकास्तर समिती गठीत करावी. तर "परिशिष्ट-ड-५" बाबत उपविभागीय अधिकारी यांनी समिती गठित करावी.

६. सदरहू सर्वेक्षणाच्या कामाचे सनियंत्रण करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागास राज्य स्तरावरील नोडल विभाग म्हणून घोषित करण्यात येत आहे. सर्वेक्षणाच्या कामासाठी राज्य स्तरावर स्वतंत्र कक्ष उघडण्यात येत असून त्याचे कार्यालय महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., बॅरेक नं.१८, सचिवालय जिमखान्यामागे, काँग्रेस कमिटीजवळ, मुंबई-४०००२१ येथे असेल. सदरहू कक्षाचे कक्ष प्रमुख श्री. राकेश बेद, उप महाव्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., मुंबई हे असतील तर सदर सर्वेक्षणाच्या कामासाठी श्री.अविनाश झाडे, भा.प्र.से., व्यवस्थापकीय संचालक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या., मुंबई यांची "नोडल ऑफिसर" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

७. इन-सॅनिटरी लॅटरिन्स (शौचालये) व त्यावरील कार्यरत सफाई कामगार याबाबतचे सर्वेक्षण सुरु होण्यापुर्वी नोडल ऑफिसर तसेच समन्वय कक्षाने जिल्हास्तर, महानगरपालिका व नगरपालिका स्तरावरील समितीप्रमुख तसेच सर्व जिल्हाधिकारी यांची राज्य स्तरावर बैठक आयोजित करावी व त्यांना सर्वेक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यात यावे. याशिवाय सर्वेक्षणाच्या दरम्यान वेळोवेळी आढावा बैठक घेण्यात यावी.

८. सदर सर्वेक्षणाबाबत नोडल ऑफिसर व राज्यस्तर सर्वेक्षण कक्षाने राज्यातील २५६ स्टॅटूटरी शहरामध्ये आकाशवाणी, दुरदर्शन, वृत्तपत्रे, भिंतीपत्रे अशा विविध प्रसिध्दी माध्यमाव्दारे मोठया प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. इन-सॅनिटरी लॅटरिन्स असलेल्या प्रभागाची माहिती/ यादी प्रादेशिक जनगणना कार्यालयाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दयावी. यासाठी जिल्हाधिकारी यांनी जनगणना कार्यालयातील संबंधीत अधिका-याशी थेट संपर्क साधावा व यादी प्राप्त करावी. नोडल ऑफीसर व सर्वेक्षण कक्षाने सर्वेक्षणाबाबत राज्यस्तर समितीच्या मार्गदर्शनाखाली सनियंत्रण करावे. सर्वेक्षणाबाबत भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाकडून प्राप्त झालेली पत्रके, सुचना नमुने इत्यादी यांचे मराठी भाषेत अनुवाद करुन त्यांनी आवश्यक प्रति जिल्हास्तर समिती / कक्षाकडे पाठवाव्यात. या कक्षाने जिल्हास्तर महानगरपालिका / नगरपालिका समितीकडून प्राप्त माहिती भारत सरकारच्या सुचनांनुसार संकलित करुन अनुषंगिक कार्यवाही करावी.

९. इन-सॅनिटरी लॅटरिन्स चे मालक व त्यावरील कार्यरत सफाई कामगार यांच्याशी थेट संपर्क साधून सदरहू सर्वेक्षण मर्यादित कालावधीत पार पाडावे. सर्वेक्षणाचे काम हे भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाने विहित केलेल्या पध्दतीनुसार व घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार पार पाडावे. अनुषंगाने, सदरहू कामासाठी महानगरपालिका / नगरपालिका स्तरावर समिती प्रमुख यांनी इन-सॅनिटरी लॅटरिन्सच्या संख्येच्या प्रमाणात केंद्रे (सेंटरस) स्थापित करावित. या प्रत्येक केंद्रासाठी प्रगणक, संगणक माहिती संकलक (डाटा ऑपरेटर) व सुपरवायझर यांची नेमणूक करावी. सदर कर्मचाऱ्यांना भारत सरकारने विहित केल्याप्रमाणे मानधन देण्यात येईल. सर्वेक्षणाच्या कामासाठी भारत सरकारने नमुने (फॉर्मस) विहित केले असून ते भरणेबाबत प्रगणक, संगणक माहिती संकलक (डाटा ऑपरेटर) व सुपरवायझर यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

१०. सर्वेक्षणाच्या कामात प्रगणक, संगणक माहिती संकलक (डाटा ऑपरेटर) व सुपरवायझर यांना मार्गदर्शन करण्यासाठी राज्यातील ०६ अधिकाऱ्यांची मास्टर ट्रेनर म्हणून नेमणूक करण्यात आली असून सदर ०६ मास्टर ट्रेनरना दिनांक ०६ मार्च, २०१३ रोजी भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयामार्फत नवी दिल्ली येथे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षण घेतल्यानंतर हे प्रशिक्षित मास्टर ट्रेनर राज्यातील प्रगणक, संगणक माहिती संकलक (डाटा ऑपरेटर) व सुपरवायझर यांना विविध ठिकाणी प्रशिक्षण देतील. हे प्रशिक्षित कर्मचारी महानगरपालिका/नगरपालिका स्तरावर सर्वेक्षणाचे काम भारत सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार पार पाडतील. प्रगणक, संगणक माहिती संकलक (डाटा ऑपरेटर) व सुपरवायझर यांना भारत सरकारच्या सुचनेनुसार मानधन देण्यात येईल.

११. सर्वेक्षणाच्या कामाचे सनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी जिल्हा स्तरावर स्वतंत्र कक्ष उघडावा. सदरहू कक्षाचे कक्ष प्रमुख म्हणून उप जिल्हाधिकारी अथवा तत्सम वरिष्ठ

अधिकाऱ्यांची जिल्हाधिकारी यांनी नेमणूक करावी. सदरहू कक्ष प्रमुखाने त्या जिल्हयातील महानगरपालिका/नगरपालिका तसेच राज्यस्तर समन्वय कक्ष व राज्यस्तर नोडल ऑफिसर यांच्यामध्ये समन्वयक म्हणून काम पार पाडावे. तसेच सफाई कामगारांना मार्गदर्शन व मदत करण्यासाठी सर्व जिल्हा व नगरपलिका स्तरावर मोफत दुरध्वनी सेवा स्थापीत करण्यात यावी.

१२. भारत सरकारने देशातील एकूण ३,५४६ शहरामधील सर्वेक्षणाच्या कामासाठी एकूण रु.१८.५० कोटी इतक्या रकमेची तरतूद केली आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात आढळून आलेली एकूण २५६ शहरे व या शहरात आढळून आलेली एकूण १,७१,६८८ इतके इन-सॅनिटरी लॅटरिन्स विचारात घेऊन याबाबत करावयाचे सर्वेक्षण, यासाठी नियुक्त करावयाचे प्रगणक, संगणक माहिती संकलक (डाटा ऑपरेटर), सुपरवायझर व त्यांना दयावयाचे मानधन, सर्वेक्षणाच्या कामासाठी छापावयाचे नमुने व "स्टॅटूटरी शहरातील सफाई कामगारांच्या सर्वेक्षणाबाबतची मार्गदर्शक तत्वे" यात नमुद केलेल्या इतर अनुषंगीक बाबी यासाठी अपेक्षित असलेल्या खर्चाबाबत राज्यस्तर "नोडल ऑफिसर" यांनी तपशिलवार अंदाजपत्रक तयार करावे व ते "राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ" यांना सादर करावे. प्राप्त अंदाजपत्रकाची तपासणी करुन सदरहू महामंडळामार्फत राज्यास ७५% अर्थसहाय्य मुक्त करण्यात येईल. तर उर्वरीत २५% अर्थसहाय्य उपयोगिता प्रमाणपत्र पाठविल्यानंतर महामंडळाकडून मुक्त करण्यात येईल. त्यासाठी नगरपालिका/ महानगरपालिका यांनी जिल्हा स्तरावरील समितीस उपयोगिता प्रमाणपत्र पाठविणे तर जिल्हा स्तरावरील समितीने राज्यस्तर समितीस उपयोगिता प्रमाणपत्र पाठविणे आवश्यक राहील.

हे परिपत्रक महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे नावाने व आदेशाने निर्गमित करण्यात येत आहे.

**गो.ग.आल्हाट**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत-**

१)अप्पर मुख्य सचिव नगर विकास विभाग
२) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
३) प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग
४) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
५) सर्व जिल्हाधिकारी
६) सर्व नगरपालिकांचे प्रशासकीय अधिकारी
७) आयुक्त समाज कल्याण
८) सर्व समाज कल्याण अधिकारी
९) संचालक अर्थ व सांख्यिकी
१०) सर्व जिल्हा सांख्यिकी अधिकारी

एच-२७५० -२३

C:\Users\admin\Desktop\Paripatrak-Mahamandale\paripatrak safai kamgar.docx

परिपत्रक क्रमांक--सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे, दि.०४ मार्च,२०१३ चे सहपत्र

# परिशिष्ट- अ

## सर्वेक्षणाबाबतचे वेळापत्रक

| अ. क्र. | दिनांक (दिवस संख्या) | कृति कार्यक्रम-१ | कृति कार्यक्रम-२ | कृति कार्यक्रम-३ |
|---|---|---|---|---|
| १. | दि.१९/०२/२०१३ | राज्य पदाधिकाऱ्यांचे दिशानिदेश | राज्यांना सर्वेक्षण नियम पुस्तिका, माहिती नोंद करणारे सॉफ्टवेअर, प्रसिध्दी साहित्य देणे. | |
| २. | दि.२०/०२/२०१३ | राज्यांना /संघराज्य क्षेत्रांना सल्लागार उपलब्ध करुन देणे, त्यांना सर्वेक्षण व मार्गदर्शक तत्त्वांची माहिती करुन देणे. | | |
| ३. | दि.२०/०२/२०१३ ते दि.०६/०३/२०१३ (१४ दिवस) | • जिल्हा व नगर स्तरावरील संबधित अधिकाऱ्यांचे दिशानिदेश<br>• आधार सामग्री नोंदणी कर्मचारी प्रगणक, पर्यवेक्षक यांच्या संख्यात्मक आवश्यकतेचे निर्धारण व जिल्हा / नगर स्तरीय अधिकाऱ्यांकडून त्यांची निवड<br>• स्वयं प्रतिज्ञापत्र करावयाच्या केंद्राच्या आवश्यक संख्येबाबत निर्धारण, त्या केंद्रासाठी योग्य स्थानांची निवड<br>• कुशल प्रशिक्षक बनण्यासाठी योग्य संख्येने उमेदवार निवडणे व त्यांना पुरस्कृत करणे<br>• दिनांक ६/०३/२०१३ रोजी भारत सरकारकडून दिल्ली येथे आयोजित होणारे कुशल प्रशिक्षकांचे प्रशिक्षण | •स्थानिक भाषेतील अनुवाद ,छपाई यांसह प्रसिध्दी विषयक सामग्री तयार करणे आणि ती जिल्ह्यांना /नगरांना पाठविणे.<br>•सर्वेक्षण मार्गदर्शक तत्वे नियम पुस्तिका, नमुने यांचा अनुवाद करणे व आवश्यक संख्येने त्यांची छपाई करणे आणि ते जिल्ह्यांना / नगरांना पाठविणे.<br>• जेथे आवश्यक असेल तेथे प्रणाली (सॉफ्टवेअर) नियम पुस्तिकेचा प्रादेशिक भाषेत अनुवाद करणे. | •राज्य, जिल्हा व नगर स्तरावर समित्यांची रचना |
| ४. | दि.७/०३/२०१३ ते दि.१९/०३/२०१३ (१३ दिवस) | • आधारसामुग्री नोंदणी कर्मचारी ,प्रगणक व पर्यवेक्षक यांची नियुक्ती व त्यांचे प्रशिक्षण. | • आवश्यक साधने, लेखनसामग्री, फर्निचर इत्यादींसह संगणकाची व्यवस्था करुन स्वयं | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | •स्वयं प्रतिज्ञापत्र करावयाचे केंद्र (केंद्रे) यांसाठी एका अधिकाऱ्यांची नियुक्ती<br>• तक्रारी व हरकती स्वीकारण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्याची नियुक्ती<br>• स्थानिक प्रसिध्दी | प्रतिज्ञापत्र करावयाच्या केंद्राची स्थापना करणे. | |
| ५. | दि.२०/०३/२०१३ ते दि.२६/०३/२०१३ (सुट्टयांसह ७ दिवस) | निर्दिष्ट केलेल्या केंद्रावर स्वयं प्रतिज्ञापत्रे सादर करणे | | |
| ६. | दि.२७/०३/२०१३ ते दि.०३/०४/२०१३ (७ दिवस) | •अशासकीय संघटनेद्वारे दिलेल्या यादीच्या आधारे, मेहतर हाताने काम करणारा असल्याने क्षेत्रात जाऊन सर्वेक्षण करणे आणि भारताचे महानिबंधक यांच्या प्रभागनिहाय माहितीच्या आधारे, अनारोग्यकारी शौचकूप मोठया प्रमाणात एकत्रित असलेले क्षेत्र पुन: निश्चित करणे . | •सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या माहितीचा संग्रह करणे आणि ती एकरुप करणे व जिल्हा एनआयसी (NIC) केंद्राच्या संगणकावर माहिती साठविणे. | |
| ७. | दि.०४/४/२०१३ ते दि.१०/४/२०१३ (०७ दिवस) | •प्रगणकाद्वारे पडताळणी. | •प्रगणकाद्वारे केलेल्या पडताळणीच्या आधारे, माहितीचे अद्ययावतीकरण. | |
| ८. | दि.११/४/२०१३ ते दि.१७/४/२०१३ (०७ दिवस) | •पर्यवेक्षकांद्वारे नमुना तपासणी. | पर्यवेक्षकांद्वारे केलेल्या पडताळणीच्या आधारे, माहितीचे अद्ययावतीकरण. | |
| ९. | दि.१८/०४/२०१३ ते दि.०१/०५/२०१३ (१४ दिवस) | •सोडून गेलेल्या व्यक्तींची नव्याने नाव नोंदणी / त्याबाबत हरकती मागविणे आणि मसुदा सूची तयार करणे. | • हरकती/ नाव नोंदणी झालेल्या व्यक्तींची पडताळणी. | •हरकती/ नवीन नाव नोंदणीच्या आधारे माहितीचे अद्ययावतीकरण. |
| १०. | दि.०२/०५/२०१३ ते दि.२९/०५/२०१३ | नगर (शहर), जिल्हे, राज्ये व राष्ट्रीय सर्वेक्षण अहवाल तयार करणे व त्याचे विश्लेषण करणे व माहिती विधीग्राह्य करणे. | | |

परिपत्रक क्र.सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे, दि.४ मार्च,२०१३

## परिशिष्ट- ब

| अ.क्र | जिल्हा | शहर | शौचालय असलेली घरे | उघडया नालीचा वापर केलेली शौचालये | मानवाद्वारे शौचालयाची सफाई | बेरीज (५+६) | प्राण्यांद्वारेची विष्ठेची विल्हेवाट | एकुण बेरीज (७+८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | मुंबई | मुंबई (म.न.पा.) | १५,३५,८३१ | ३६,८८३ | १,१३७ | ३८,०२० | ९,९९१ | ४८,०११ |
| २ | अहमदनगर | अहमदनगर (म.न.पा.) | ६४,३१० | २,०४६ | १० | २,०५६ | ३०३ | २,३५९ |
| ३ | | शिर्डी (न.पा.) | ५,११३ | ४२५ | ० | ४२५ | ५८ | ४८३ |
| ४ | | संगमनेर (न.पा.) | १०,९०६ | ३२६ | ० | ३२६ | ० | ३२६ |
| ५ | | श्रीरामपूर (न.पा.) | ११,२२९ | ५४ | ० | ५४ | ० | ५४ |
| ६ | | श्रीगोंदा (न.पा.) | ३,१२४ | २० | ० | २० | ० | २० |
| ७ | | कोपरगाव (न.पा.) | ६,९७३ | २१ | ० | २१ | ० | २१ |
| ८ | | अहमदनगर (न.पा.) | ३,११६ | ३६ | ० | ३६ | ३ | ३९ |
| ९ | | पाथर्डी (न.पा.) | ३,१६३ | ३ | ० | ३ | २ | ५ |
| १० | | राहता पिंपळस (न.पा.) | २,३०७ | ५ | ० | ५ | ० | ५ |
| ११ | | राहुरी (न.पा.) | ४,४६२ | २ | ० | २ | ० | २ |
| १२ | | देवळाली प्रवरा (न.प.) | २,८३२ | ३ | ० | ३ | ० | ३ |
| १३ | अकोला | अकोला (म.न.पा.) | ६३,०८४ | १,६०१ | ६७ | १,६६८ | ३०३ | १,९७१ |
| १४ | | आकोट (न.पा.) | १२,७३२ | ८०० | ५३० | १,३३० | ५२४ | १,८५४ |
| १५ | | बाळापूर (न.पा.) | ६,१६९ | ३९ | ० | ३९ | ३० | ६९ |
| १६ | | मूर्तीजापूर (न.पा.) | ५,९६६ | ३६ | २७ | ६३ | २ | ६५ |
| १७ | | पातूर (न.पा.) | २,४७७ | ९ | ० | ९ | ३२ | ४१ |
| १८ | | तेल्लारा (न.पा.) | २७५३ | ७ | ० | ७ | ० | ७ |
| १९ | अमरावती | अमरावती (म.न.पा.) | १,११,१५२ | ६९८ | ५९ | ७५७ | २३८ | ९९५ |
| २० | | अचलपूर (न.पा.) | १६,४७५ | ४६३ | ० | ४६३ | ७३ | ५३६ |
| २१ | | दर्यापूर बनोसा (न.पा.) | ५,४१५ | १९ | ० | १९ | ९६ | ११५ |
| २२ | | चांदूरबाजारा (न.पा.) | २,६३४ | ४० | २४ | ६४ | १९ | ८३ |
| २३ | | अंजनगाव (न.पा.) | ७,९३९ | २४ | ० | २४ | ९ | ३३ |
| २४ | | दत्तापूर धारणगाव(न.पा.) | ३,१३२ | १३ | ० | १३ | १० | २३ |
| २५ | | मोर्शी (न.पा.) | ५,८९२ | १८ | ० | १८ | १ | १९ |
| २६ | | वरुड (न.पा.) | ७,४९६ | १४ | ० | १४ | ५ | १९ |
| २७ | | चांदूर रेल्वे (न.पा.) | २,७४७ | १० | ० | १० | १ | ११ |
| २८ | | चिखलदरा (न.पा.) | ५६६ | २ | ० | २ | १ | ३ |
| २९ | | शेंदूरजना (न.पा.) | १,९४० | १ | ० | १ | १ | २ |
| ३० | औरंगाबाद | औरंगाबाद (म.न.पा.) | २,११,१२७ | ६,९५८ | ० | ६,९५८ | १,९१९ | ८,८७७ |
| ३१ | | पैठण (न.पा.) | ५,०५० | ३७ | ० | ३७ | ९५ | १३२ |
| ३२ | | औरंगाबाद (सी.बी.) | २,०८५ | १०९ | ० | १०९ | ० | १०९ |
| ३३ | | सिल्लोड (न.पा.) | ७,०२१ | २९ | ० | २९ | ४५ | ७४ |
| ३४ | | गंगापूर (न.पा.) | ३,०८३ | ३९ | ० | ३९ | १ | ४० |
| ३५ | | कन्नड (न.पा.) | ५,०७० | १९ | ० | १९ | ६ | २५ |
| ३६ | | विजापूर (न.पा.) | ४,८५२ | १७ | ० | १७ | २ | १९ |
| ३७ | | खुलताबाद (न.पा.) | १,८६७ | ० | ० | ० | २ | २ |
| ३८ | भंडारा | भंडारा (न.पा.) | १८,०४८ | १६ | ० | १६ | २३ | ३९ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | | तुमसर(न.पा.) | ७,७९५ | २ | ० | २ | ३ | ५ |
| ४० | | पवनी(न.पा) | ३,६५७ | ४ | ० | ४ | ० | ४ |
| ४१ | बीड | बीड (न.पा.) | २४,१४० | २८३ | ० | २८३ | ६४ | ३४७ |
| ४२ | | परळी (न.पा.) | १२,०६० | २३३ | ० | २३३ | १०४ | ३३७ |
| ४३ | | अंबेजोगाई (न.पा.) | ९,६६३ | १८७ | ० | १८७ | ३५ | २२२ |
| ४४ | | गेवराई (न.पा.) | ३,७५९ | १७० | ० | १७० | २ | १७२ |
| ४५ | | माजलेगाव (न.पा.) | ५,९०८ | २८ | ० | २८ | ८३ | १११ |
| ४६ | | केज (न.पा) | ३,१४९ | ८ | ० | ८ | ४४ | ५२ |
| ४७ | | धारुर (न.पा.) | १,६४१ | १ | ० | १ | ० | १ |
| ४८ | बुलढाणा | मलकापुर(न.पा.) | ८,०६८ | १६ | १९६ | २१२ | १० | २२२ |
| ४९ | | शेगांव (न.पा.) | ६,५२७ | १३७ | ० | १३७ | १ | १३८ |
| ५० | | मेहकर (न.पा.) | ४,६८८ | ५४ | ० | ५४ | ५ | ५९ |
| ५१ | | देऊळगांव राजा (न.पा.) | ३,६३२ | ३६ | ० | ३६ | ३ | ३९ |
| ५२ | | नांदुरा(न.पा.) | ५,६५३ | ३ | ० | ३ | ३३ | ३६ |
| ५३ | | चिखली (न.पा.) | ७,९४२ | ७ | ० | ७ | २० | २७ |
| ५४ | | खामगांव (न.पा.) | १०,८१४ | १६ | ० | १६ | ४ | २० |
| ५५ | | सिंदखेड राजा (न.पा.) | १,२६३ | १८ | ० | १८ | ० | १८ |
| ५६ | | जळगाव (जामोद) (न.पा. | २,५८२ | १३ | ० | १३ | १ | १४ |
| ५७ | | बुलढाणा (न.पा.) | १०,००२ | ५ | ० | ५ | ० | ५ |
| ५८ | | लोणार (न.पा.) | २,०८१ | ३ | ० | ३ | १ | ४ |
| ५९ | चंद्रपूर | चंद्रपूर (न.पा.) | ५६,०९८ | १५१ | ६९ | २२० | १२५ | ३४५ |
| ६० | | भाद्रावाडी (न.पा.) | १०,८६६ | १२९ | ६८ | १९७ | ४० | २३७ |
| ६१ | | वारोना (न.पा.) | ७,७१८ | ५ | १०७ | ११२ | ३१ | १४३ |
| ६२ | | बालापूर (न.पा.) | १३,८७४ | ४२ | ० | ४२ | १ | ४३ |
| ६३ | | ब्रम्हापुरी (न.पा.) | ६,१७२ | १४ | ० | १४ | १ | १५ |
| ६४ | | मूळ (न.पा.) | ३,११३ | २ | ० | २ | ० | २ |
| ६५ | | राजुरा (न.पा.) | ४,६८७ | ० | ० | ० | २ | २ |
| ६६ | धुळे | धुळे (म.न.पा.) | ४६,९२९ | ३२७ | ० | ३२७ | ६६ | ३९३ |
| ६७ | | शिरपूर वरवडे (न.पा.) | ९,३५७ | १० | ० | १० | ७ | १७ |
| ६८ | | दोंडीचा वरवडे (न.पा.) | ४,५८६ | १ | ० | १ | १ | २ |
| ६९ | गडचिरोली | गडचिरोली (न.पा.) | ९,२५५ | २० | १०६ | १२६ | २ | १२८ |
| ७० | | देसाईगंज (न.पा.) | ३,५२० | १२ | १२ | २४ | २ | २६ |
| ७१ | गोंदिया | गोंदिया (न.पा.) | २३,९२८ | २१ | ० | २१ | ७ | २८ |
| ७२ | | तिरोडा (न.पा.) | ३,७५७ | १ | ० | १ | १ | २ |
| ७३ | हिंगोली | हिंगोली (न.पा.) | १०,३८३ | १००१ | ० | १००१ | ८३ | १०८४ |
| ७४ | | बासमत (न.पा.) | ७,७६८ | ६१३ | २५ | ६३८ | १२१ | ७५९ |
| ७५ | | कळमनुरी (न.पा.) | २,८१२ | ४१ | ० | ४१ | १० | ५१ |
| ७६ | जळगांव | जळगाव (म.न.पा.) | ७१,९११ | २१५ | ० | २१५ | ३७ | २५२ |
| ७७ | | भुसावळ (न.पा.) | २९,१३३ | ९६ | ० | ९६ | १४२ | २३८ |
| ७८ | | फैजपूर (न.पा.) | ३,२१४ | २ | ० | २ | ७५ | ७७ |
| ७९ | | अंमळनेर (न.पा.) | ११,६२१ | ३२ | ० | ३२ | १४ | ४६ |
| ८० | | यावल (न.पा.) | ३,९६३ | ४२ | ० | ४२ | २ | ४४ |
| ८१ | | चोपडा (न.पा.) | ७,२७० | ३० | ० | ३० | ४ | ३४ |
| ८२ | | वडगांव (न.पा.) | ३,४६० | १८ | ० | १८ | २ | २० |
| ८३ | | रावेर (न.पा.) | २,४५९ | १४ | ० | १४ | ० | १४ |
| ८४ | | पाचोरा (न.पा.) | ६,१७७ | ९ | ० | ९ | ३ | १२ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८५ | | चाळीसगांव (न.पा.) | ११,८२६ | ४ | ० | ४ | ७ | ११ |
| ८६ | | जामनेर (न.पा.) | ५,४७१ | ८ | ० | ८ | ० | ८ |
| ८७ | | एरंडोल (न.पा.) | २,६३४ | ५ | ० | ५ | ० | ५ |
| ८८ | | पारोळा (न.पा.) | ३,५७३ | ० | ० | ० | २ | २ |
| ८९ | | धरणगांव (न.पा.) | २,२६५ | १ | ० | १ | ० | १ |
| ९० | | सावदा (न.पा.) | १,८९७ | ० | ० | ० | ० | ० |
| ९१ | जालना | जालना (न.पा.) | ३८,६३८ | १,७०२ | १५२ | १,८५४ | २१४ | २,०६८ |
| ९२ | | भोकरदन (न.पा.) | २,८४६ | २८ | ० | २८ | २० | ४८ |
| ९३ | | परतूर (न.पा.) | ३,५५९ | १० | ० | १० | ८ | १८ |
| ९४ | | अंबड (न.पा.) | ३,७५४ | ९ | ० | ९ | ० | ९ |
| ९५ | कोल्हापूर | कोल्हापूर (म.न.पा.) | ९५६६० | २०८९ | ३३ | २,१२२ | ३२५ | २,४४७ |
| ९६ | | इचलकरंजी (न.पा.) | ३८,७६३ | ६०८ | ६१ | ६६९ | २१ | ६९० |
| ९७ | | जयसिंगपूर (न.पा.) | ७,९८७ | २ | ० | २ | ११ | १३ |
| ९८ | | कागल (न.पा.) | ४,२२७ | १० | ० | १० | ० | १० |
| ९९ | | कुरुंदवाड (न.पा.) | २,२३७ | ६ | ० | ६ | ३ | ९ |
| १०० | | वडगांव कसबा (न.पा.) | ३,०१४ | ४ | ० | ४ | २ | ६ |
| १०१ | | गडहिंग्लज (न.पा.) | ४,६१४ | ३ | ० | ३ | १ | ४ |
| १०२ | | पन्हाळा (न.पा.) | ४६५ | ० | ० | ० | २ | २ |
| १०३ | | मलकापुर(न.पा.) | ७७३ | ० | ० | ० | ० | ० |
| १०४ | | मुरगुड (न.पा.) | १,६९० | ० | ० | ० | ० | ० |
| १०५ | लातूर | लातूर (न.पा.) | ६२,२७९ | २४१ | ० | २४१ | ५१७ | ७५८ |
| १०६ | | उदगीर (न.पा.) | १२,८९३ | ३६३ | ० | ३६३ | ७८ | ४४१ |
| १०७ | | अंबडपूर (न.पा.) | ४,६८१ | २४ | ० | २४ | २ | २६ |
| १०८ | | औसा (न.पा.) | ३,०५३ | ३ | ० | ३ | २३ | २६ |
| १०९ | | निलंगा (न.पा.) | ३,२२५ | ६ | ० | ६ | ३ | ९ |
| ११० | नागपूर | नागपूर (म.न.पा.) | ४,७८,८३५ | ४,३६६ | ३२ | ४,३९८ | ३,२०३ | ७,६०१ |
| १११ | | कामठी (न.पा.) | १२,८५४ | ४६६ | ० | ४६६ | १८२ | ६४८ |
| ११२ | | सावनेर (न.पा.) | ५,२७४ | ८ | ० | ८ | १५ | २३ |
| ११३ | | उमरेड (न.पा.) | ९,२६९ | ९ | ० | ९ | २ | ११ |
| ११४ | | नरखेड (न.पा.) | २,१६१ | ० | ० | ० | ३ | ३ |
| ११५ | | मोवाड (न.पा.) | १,११६ | २ | ० | २ | ० | २ |
| ११६ | | कामठी (कॅन्टोंमेंट बो.) | ६७८ | १ | ० | १ | ० | १ |
| ११७ | | खापा (न.पा.) | १,६९५ | १ | ० | १ | ० | १ |
| ११८ | | रामटेक (न.पा.) | ३,३८४ | १ | ० | १ | ० | १ |
| ११९ | | कळमेश्वर (न.पा.) | २,९९५ | ० | ० | ० | ० | ० |
| १२० | | काटोल (न.पा.) | ६,६४८ | ० | ० | ० | ० | ० |
| १२१ | | मोहपा (न.पा.) | ८४७ | ० | ० | ० | ० | ० |
| १२२ | नांदेड | नांदेड वाघाळा(म.न.पा.) | ८६,८०६ | ६,४१६ | ८१ | ६,४९७ | १७८ | ६,६७५ |
| १२३ | | देगलूर (न.पा.) | ७,१३१ | ३७९ | ० | ३७९ | ४८ | ४२७ |
| १२४ | | धर्माबाद (न.पा.) | ३,२६१ | १३७ | ० | १३७ | १ | १३८ |
| १२५ | | मुखेड (न.पा.) | ३,०२४ | ७८ | ० | ७८ | ५३ | १३१ |
| १२६ | | किनवट (न.पा.) | ३,३६० | ९९ | ० | ९९ | ६ | १०५ |
| १२७ | | मुदखेड (न.पा.) | १,३७९ | ९६ | ० | ९६ | ४ | १०० |
| १२८ | | हदगाव (न.पा.) | २,८४६ | ६ | ३६ | ४२ | १४ | ५६ |
| १२९ | | कंधार (न.पा.) | २,७३१ | ४० | ० | ४० | ५ | ४५ |
| १३० | | भोकर (न.पा.) | ३,७०३ | ४० | ० | ४० | ४ | ४४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३१ | | कुंदलवाडी (न.पा.) | ८१९ | १७ | ० | १७ | ५ | २२ |
| १३२ | | बिलोली (न.पा.) | १,२६५ | ११ | ० | ११ | ८ | १९ |
| १३३ | | लोहा (न.पा.) | २,०८२ | १३ | ० | १३ | ० | १३ |
| १३४ | | पेठ उमरी (न.पा.) | १,२०१ | २ | ० | २ | १ | ३ |
| १३५ | नंदुरबार | शहादे (न.पा.) | ७,०६२ | १११ | ० | १११ | ४० | १५१ |
| १३६ | | नंदुरबार (न.पा.) | १४,३१४ | ६३ | २८ | ९१ | १३ | १०४ |
| १३७ | | नवापूर (न.पा.) | ३,५९७ | १४ | ० | १४ | ० | १४ |
| १३८ | | तळोदे (न.पा.) | २,५३७ | ९ | ० | ९ | ० | ९ |
| १३९ | नाशिक | नाशिक (म.न.पा.) | २,५४,२५२ | २,०९२ | २८ | २,१२० | ५१६ | २,६३६ |
| १४० | | मालेगाव (म.न.पा.) | ३०,९४७ | ८५ | ० | ८५ | १३ | ९८ |
| १४१ | | मनमाड (न.पा.) | ९,५०६ | ३९ | ० | ३९ | ६ | ४५ |
| १४२ | | सिन्नर (न.पा.) | ८,२४३ | ३५ | ० | ३५ | ५ | ४० |
| १४३ | | इगतपुरी (न.पा.) | ४,१६० | ११ | १४ | २५ | ४ | २९ |
| १४४ | | देवळाली (कॅन्टोमेंट बो.) | ६,०८० | ११ | ० | ११ | २ | १३ |
| १४५ | | सटाणा (न.पा.) | ५,६२५ | ६ | ० | ६ | ५ | ११ |
| १४६ | | येवला (न.पा.) | ६,५१४ | ९ | ० | ९ | १ | १० |
| १४७ | | नांदगाव (न.पा.) | २,६०१ | २ | ० | २ | १ | ३ |
| १४८ | | भगुर (न.पा.) | १,०५६ | १ | ० | १ | ० | १ |
| १४९ | | त्रिंबक (न.पा.) | १,२५६ | ० | ० | ० | ० | ० |
| १५० | उस्मानाबाद | भूम (न.पा.) | १,८८० | १ | ० | १ | ८० | ८१ |
| १५१ | | उस्मानाबाद (न.पा.) | १४,७५० | २४ | ० | २४ | १७ | ४१ |
| १५२ | | तुळजापूर (न.पा.) | ३,५८८ | ३७ | ० | ३७ | ३ | ४० |
| १५३ | | कळंब (न.पा.) | २,९५४ | २० | ० | २० | ८ | २८ |
| १५४ | | नळदुर्ग (न.पा.) | १,२९० | ३ | ० | ३ | १२ | १५ |
| १५५ | | उमरगा (न.पा.) | ४,०६७ | १० | ० | १० | ० | १० |
| १५६ | | परांडा (न.पा.) | १,५०९ | ७ | ० | ७ | २ | ९ |
| १५७ | | मुरूड (न.पा) | १,१४० | २ | ० | २ | ० | २ |
| १५८ | परभणी | परभणी (न.पा) | ४१,९७३ | १,४६५ | - | १,४६५ | ४१८ | १,८८३ |
| १५९ | | जिंतुर (न.पा) | ५,५७७ | ९४ | २६ | १२० | ७९ | १९९ |
| १६० | | पाथरी (न.पा.) | ३,६८१ | ८१ | १२ | ९३ | ५६ | १४९ |
| १६१ | | गंगाखेड (न.पा.) | ५,६८१ | ९४ | - | ९४ | ११ | १०५ |
| १६२ | | पुर्णा (न.पा.) | ३,६८१ | ७९ | - | ७९ | ७ | ८६ |
| १६३ | | मनवट (न.पा.) | २,७७७ | ३५ | - | ३५ | १८ | ५३ |
| १६४ | | शेलु (न.पा.) | ५,९१३ | २६ | - | २६ | १२ | ३८ |
| १६५ | | सोनपेठ (न.पा.) | १,१२० | ५ | - | ५ | - | ५ |
| १६६ | पुणे | पुणे (म.न.पा.) | ५,८१,२०६ | १०,३८४ | ९४ | १०,४७८ | १,५४५ | १२,०२३ |
| १६७ | | पिंपरी चिंचवड(म.न.पा.) | ३,४७,१३२ | ८,४३६ | २२३ | ८,६५९ | ६२२ | ९,२८१ |
| १६८ | | सासवड (न.पा.) | ५,१२४ | ३८० | ८३ | ४६३ | १२० | ५८३ |
| १६९ | | लोणावळा (न.पा.) | ७,५६८ | ३९६ | - | ३९६ | ५३ | ४४९ |
| १७० | | दौंड (न.पा.) | ७,०४८ | ६७ | - | ६७ | ६५ | १३२ |
| १७१ | | भोर (न.पा.) | २,८६१ | १ | १०४ | १०५ | - | १०५ |
| १७२ | | देहु रोड (न.पा.) | ५,२३८ | ६७ | - | ६७ | ३ | ७० |
| १७३ | | खडकी (न.पा.) | ८,४६५ | २५ | - | २५ | २८ | ५३ |
| १७४ | | पुणे (कन्टोनमेंट बोर्ड) | १३,००२ | १७ | १६ | ३३ | ११ | ४४ |
| १७५ | | तळेगांव दाभाडे (न.पा.) | १०,८९० | २१ | - | २१ | ६ | २७ |
| १७६ | | जुन्नर (न.पा.) | ४,२६६ | २२ | - | २२ | - | २२ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १७७ | | बारामती (न.पा.) | ७,४०८ | १७ | - | १७ | - | १७ |
| १७८ | | शिरूर (न.पा.) | ५,४४५ | ६ | - | ६ | - | ६ |
| १७९ | | आळंदी (न.पा.) | ५,५०६ | २ | - | २ | १ | ३ |
| १८० | | इंदापुर (न.पा.) | ३,६१८ | १ | - | १ | १ | २ |
| १८१ | | जेजुरी (न.पा.) | २,०७८ | २ | - | २ | - | २ |
| १८२ | रायगड | पनवेल (न.पा.) | ३७,६५३ | ७९९ | - | ७९९ | १४९ | ९४८ |
| १८३ | | खेपोली (न.पा.) | ९,५३३ | ५ | १०८ | ११३ | ५ | ११८ |
| १८४ | | श्रीवर्धन (न.पा.) | २,४०१ | ५७ | - | ५७ | - | ५७ |
| १८५ | | पेण (न.पा.) | ७,११२ | ३३ | - | ३३ | १२ | ४५ |
| १८६ | | उरण (न.पा.) | ४,६५५ | २ | - | २ | ३ | ५ |
| १८७ | | रोहा अष्टमी (न.पा.) | ३,३८९ | १ | - | १ | ३ | ४ |
| १८८ | | अलिबाग (न.पा.) | ३,४८९ | २ | - | २ | १ | ३ |
| १८९ | | महाड (न.पा.) | ५,५१२ | १ | - | १ | १ | २ |
| १९० | | कर्जत (न.पा.) | ४,७९५ | १ | - | १ | - | १ |
| १९१ | | माथेरान (न.पा.) | ६६५ | - | - | - | १ | १ |
| १९२ | | मुरूड जंजिरा(न.पा.) | २,१३३ | - | - | - | - | - |
| १९३ | रत्नागिरी | रत्नागिरी (न.पा.) | १३,६६८ | ११७ | - | ११७ | ३३ | १५० |
| १९४ | | चिपळूण (न.पा.) | १०,०४० | ९२ | - | ९२ | २ | ९४ |
| १९५ | | दापोली कॅम्प (न.पा.) | ३,१४५ | १५ | - | १५ | - | १५ |
| १९६ | | राजापूर (न.पा.) | १,६०६ | ५ | - | ५ | २ | ७ |
| १९७ | | खेड (न.पा.) | २,९९३ | - | - | - | - | - |
| १९८ | सांगली | सांगलीमिरजकुपवाड(म. | ८७,८२६ | ४,२३९ | ७२ | ४,३११ | ३८० | ४,६९१ |
| १९९ | | उरण इस्लामपूर(न.पा.) | ११,०२६ | ५ | ३८४ | ३८९ | ९ | ३९८ |
| २०० | | आष्टा(न.पा.) | ४,४२२ | ९ | - | ९ | ३८ | ४७ |
| २०१ | | विटा (न.पा.) | ६,६७७ | ९ | - | ९ | ३ | १२ |
| २०२ | | तासगांव (न.पा.) | ४,७१८ | २ | - | २ | - | २ |
| २०३ | सातारा | कराड (न.पा.) | ८,७६० | ४४ | - | ४४ | ३ | ४७ |
| २०४ | | महाबळेश्वर (न.पा.) | ७,७८७ | ३७ | - | ३७ | - | ३७ |
| २०५ | | पाचगणी (न.पा.) | १,८३४ | - | - | - | ३० | ३० |
| २०६ | | मलकापूर (न.पा.) | ६,३१५ | ८ | - | ८ | ७ | १५ |
| २०७ | | सातारा (न.पा.) | २१,०२० | ९ | - | ९ | १ | १० |
| २०८ | | वाई (न.पा.) | ५,१४५ | ८ | - | ८ | १ | ९ |
| २०९ | | फलटण (न.पा.) | ७,१७१ | ४ | - | ४ | ४ | ८ |
| २१० | | रहिमतपूर (न.पा.) | १,५८५ | २ | - | २ | - | २ |
| २११ | | म्हसवड (न.पा.) | १,३६९ | १ | - | १ | - | १ |
| २१२ | सिंधुदुर्ग | मालवण(न.पा.) | ३,५२२ | १० | - | १० | - | १० |
| २१३ | | कणकवली (न.पा.) | ३,६२५ | १ | - | १ | - | १ |
| २१४ | | वेंगुर्ला(न.पा.) | २,१३४ | - | - | - | १ | १ |
| २१५ | | सावंतवाडी (न.पा.) | ४,८९५ | - | - | - | - | - |
| २१६ | सोलापूर | सोलापूर (म.न.पा.) | १,११,४२८ | ३,६६७ | १३० | ३,७९७ | ७१८ | ४,५१५ |
| २१७ | | पंढरपूर (न.पा.) | १३,२९२ | ६२३ | - | ६२३ | १७६ | ७९९ |
| २१८ | | करमाळा (न.पा.) | २,४६४ | १५० | - | १५० | - | १५० |
| २१९ | | बार्शी (न.पा.) | १४,०१३ | १०१ | - | १०१ | १० | १११ |
| २२० | | सांगोला (न.पा.) | ३,१२३ | १० | - | १० | २ | १२ |
| २२१ | | अक्कलकोट (न.पा.) | २,७४१ | ५ | - | ५ | १ | ६ |
| २२२ | | मंदारगी (न.पा.) | ३१६ | १ | - | १ | ३ | ४ |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २२३ | | कुर्डुवाडी (न.पा.) | २,७४० | २ | - | २ | - | २ |
| २२४ | | दुधानी (न.पा.) | २५२ | - | - | - | १ | १ |
| २२५ | | मंगळवेढा (न.पा.) | १,६६१ | १ | - | १ | - | १ |
| २२६ | ठाणे | नवीमुंबई (म.न.पा.) | २,००,३२९ | ६,२५८ | ४६ | ६,३०४ | १,१२७ | ७,४३१ |
| २२७ | | ठाणे (म.न.पा.) | २,९८,८०२ | ३,८२७ | ५९ | ३,८८६ | १,४०३ | ५,२८९ |
| २२८ | | कल्याण डोंबिवली (म.न. | २,५२,०३५ | ४,०६५ | १६४ | ४,२२९ | ५७६ | ४,८०५ |
| २२९ | | उल्हासनगर (म.न.पा.) | ७७,९९७ | ३,९८३ | १७ | ४,००० | ३६० | ४,३६० |
| २३० | | वसई विरार (म.न.पा.) | २,२५,७०१ | १,३१३ | १२९ | १,४४२ | १,२६३ | २,७०५ |
| २३१ | | भिवंडी निजामपूर(म.न.प | ४८,९०२ | ८६८ | २७१ | १,१३९ | २५७ | १,३९६ |
| २३२ | | मिराभाईदर (म.न.पा.) | १,५१,७५४ | ५८० | - | ५८० | ४०८ | ९८८ |
| २३३ | | अंबरनाथ(न.पा.) | ३५,८२४ | ८५९ | १७ | ८७६ | १५ | ८९१ |
| २३४ | | बदलापूर (न.पा.) | ३३,७४३ | १६९ | १२९ | २९८ | २२ | ३२० |
| २३५ | | पालघर (न.पा.) | १०,८०९ | १५ | १० | २५ | १६९ | १९४ |
| २३६ | | डहाणु (न.पा.) | ६,६८९ | ४६ | - | ४६ | १ | ४७ |
| २३७ | | जव्हार (न.पा.) | १,६२८ | १ | - | १ | - | १ |
| २३८ | वर्धा | हिंगनघाट (न.पा.) | १७,०६० | ४५ | - | ४५ | ११५ | १६० |
| २३९ | | आर्वी (न.पा.) | ६,५८२ | ६० | - | ६० | ७ | ६७ |
| २४० | | वर्धा (न.पा.) | २०,३९७ | २८ | - | २८ | १२ | ४० |
| २४१ | | पुलगांव (न.पा.) | ४,३३८ | १४ | - | १४ | १८ | ३२ |
| २४२ | | सिंधी(न.पा.) | १,५८९ | ७ | - | ७ | १ | ८ |
| २४३ | | देवळी (न.पा.) | २,३२४ | ४ | - | ४ | - | ४ |
| २४४ | वाशिम | वाशिम (न.पा.) | १०,४२४ | १२६ | - | १२६ | ३१ | १५७ |
| २४५ | | मंगळुरपीर(न.पा.) | ४,०८६ | १८ | - | १८ | ६१ | ७९ |
| २४६ | | कारंजा(न.पा.) | ९,०७९ | ३८ | - | ३८ | १० | ४८ |
| २४७ | | रिसोड (न.पा.) | ३,६१५ | २५ | - | २५ | १२ | ३७ |
| २४८ | यवतमाळ | यवतमाळ(न.पा.) | १७,९७२ | ८४ | - | ८४ | २१ | १०५ |
| २४९ | | वणी (न.पा.) | ८,९५६ | ६ | - | ६ | ९४ | १०० |
| २५० | | पुसद (न.पा.) | ९,६६२ | ३० | - | ३० | ३ | ३३ |
| २५१ | | पांढरकवडा (न.पा.) | ४,०१४ | १९ | - | १९ | २ | २१ |
| २५२ | | नेर (न.पा.) | ३,२६२ | १८ | - | १८ | २ | २० |
| २५३ | | उमरखेड (न.पा.) | ५,५८३ | ६ | - | ६ | २ | ८ |
| २५४ | | दिग्रस (न.पा.) | ५,१६६ | ४ | - | ४ | ३ | ७ |
| २५५ | | दारव्हा (न.पा.) | ३,४५३ | १ | - | १ | १ | २ |
| २५६ | | घाटंजी (न.पा.) | २,३८८ | - | - | - | - | - |

परिपत्रक क्र.सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे, दि.०४ मार्च, २०१३ चे

# परिशिष्ट- क.

सत्यमेव जयते

## वैधानिक शहरांमधील हाताने काम करणाऱ्या मेहतरांच्या सर्वेक्षणासाठी मार्गदर्शक तत्वे

भारत सरकार

सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय,
सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग

फेब्रुवारी, २०१३

एच-२७५७[ ५०००-३-१३]-७

हाताने काम करणारे मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांच्या सर्वेक्षणाबाबतची मार्गदर्शक तत्वे

१. **पार्श्वभूमि :-**

१.१ <u>मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांची नेहमीच्या कामातून सूटका व पूनर्वसन याबाबत राष्ट्रीय योजना (एनएसएलआरएस)</u> :- मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींचे पर्यायी व्यवसायामध्ये पूनर्वसन करण्यासाठी मार्च, १९९२ मध्ये मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना नेहमीच्या कामातून सूट व त्यांचे पूनर्वसन याकरिता राष्ट्रीय योजना सुरु करण्यात आली होती. राज्य शासनांकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, या योजनेखाली पूनर्वसन करावयाच्या अशा हाताने काम करणारे मेहतर त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींची संख्या सुमारे ७.७० लाख इतकी होती. यापैकी सुमारे ४.२३ लाख इतके हाताने काम करणारे मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींना १९९२ ते २००५ या कालावधीत पूनर्वसनासाठी सहाय्य करण्यात आले.

१.२ <u>हाताने काम करणाऱ्या मेहतरांच्या पूनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना (एसआरएमएस)</u>:- सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने उर्वरीत ३.४२ लाख इतके हाताने काम करणारे मेहतर व त्यांच्यावर अवलंबून अणाऱ्या व्यक्तींचे मार्च-२००९ पर्यंत पर्यायी व्यवसायांमध्ये पूनर्वसन करण्यासाठी जानेवारी, २००७ मध्ये " हाताने काम करणारे मेहतरांच्या पुनर्वसनासाठी स्वयंरोजगार योजना " सुरु केली. १८ राज्ये /संघ राज्य क्षेत्रांनी अद्याप हाताने काम करणारे मेहतर आस्तित्वात असल्याबाबत कळविले. परिणामी, दि.३१/०३/२०१० पर्यंत या योजनेस मुदतवाढ देण्यात आली. या सर्व राज्यांनी /संघ राज्यक्षेत्रांनी दिनांक ३०/०६/२०१० पर्यंत सर्व पात्र व इच्छुक ७८,९४१ इतक्या लाभार्थ्यांना पर्यायी व्यवसायांसाठी कर्जाचे संवितरण केल्याबाबत दुजोरा दिला आहे.

१.३ <u>राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या शिफारशी (एनएसी)</u> :-राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या मेहतर कामाबाबतच्या प्रश्नावरील तिच्या दिनांक २३/१०/२०१० च्या निर्णयात, रेल्वे व संबंधित राज्य शासने /स्थानिक शासन संस्था यांच्या समन्वयाने, ११ वी योजना संपण्यापूर्वी मेहतर काम करण्याची प्रथा पूर्णपणे नष्ट झाल्याबाबतची खात्री करुन घेण्याची केंद्र सरकारला विनंती केली होती. त्या निर्णयात, इतर गोष्टींबरोबर खालील बाबी आवश्यक असल्याचे नमूद केले असून त्या बाबी म्हणजे (क) उर्वरित निर्जल शौचकूप व हाताने काम करणारे मेहतर यांचे, जनतेच्या व्यापक सहभागासह प्रत्येक राज्य व संघराज्य क्षेत्रात सर्वेक्षण करणे, (ख) निर्जल शौचकूप पाडून टाकणे, (ग) सर्व हाताने काम करणारे मेहतर व त्यांचे कुटुंबिय यांचे आधुनिक पणन योग्य कौशल्याने मनो-सामाजिक व उपजीविकेच्या दृष्टीने पुनर्वसन करणे आणि पुनवर्सनाच्या उपक्रमशीलतेस पाठींबा देण्यासाठी सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने एक केंद्र पुरस्कृत योजना तयार करणे, (घ) हाताने काम करणाऱ्या मेहतरांच्या सर्व मुलांसाठी उच्च शिक्षण व संगणक शिक्षण यांसह शिक्षणाचा विशेष कार्यक्रम, आणि (ङ) मेहतर कामाची नेमकी व्याख्या निश्चित करण्यासाठी कायद्यात सुधारणा करणे आणि जे मेहतर कामासाठी कामगार नियुक्त करतात, किंवा त्यास प्रतिबंध करण्यास अपयशी ठरतात अशा सरकारी कर्मचाऱ्यांचे उत्तरदायित्व निश्चित करणे.

१.४ राष्ट्रीय सल्लागार परिषदेच्या निर्णयाच्या अनुसार, गृहनिर्माण व दारिद्रय निर्मूलन मंत्रालय, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, नगर विकास मंत्रालय व रेल्वे मंत्रालय यांच्या सचिवांसोबत नोव्हेंबर, २०१० मध्ये दोन बैठक घेण्यात आल्या. केंद्रीय कॅबिनेट सचिवाच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीनंतर या बैठका घेण्यात आल्या.

१.५ वरील बैठकीनंतर, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, गृहनिर्माण व दारिद्रय निर्मूलन मंत्रालय, नगर विकास मंत्रालय, राज्य शासनांचे व नागरी सोसायटी संघटनांचे प्रतिनिधी यांची संयुक्तपणे दिनांक २४-२५ जानेवारी , २०११ रोजी एक विचारविनिमय बैठक घेण्यात आली होती.

१.६ वरील बैठकींमधील शिफारशींच्या अनुसार, ज्यांचे अजूनही पुनर्वसन करावयाचे आहे असे हाताने काम करणारे मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचे नव्याने सर्वेक्षण करण्याचे काम हाती घेण्यासाठी तपशीलवार प्रकारदर्शक पध्दतीची शिफारस करण्यासाठी सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने दिनांक १०/०२/२०११ रोजी एका नियुक्तकार्य बलाची स्थापना केली होती. दिनांक ०६/०५/२०११ रोजी नियुक्त कार्यबलाने त्याचा अहवाल सादर केला असून. नियुक्तकार्य बलाने इतर गोष्टींबरोबर, हाताने काम करणारे मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचे देशव्यापी सर्वेक्षण करण्यासाठी एका राष्ट्रीय स्तरावरील तंत्र अभिकरण नियुक्त करण्याची शिफारस केली आहे. तथापि, योग्य अभिकरण उपलब्ध न झाल्यामुळे यास अंतिम रुप देणे शक्य झाले नाही.

## २. सर्वेक्षण करण्यासाठी प्रकारदर्शक पध्दतीची शिफारस करण्यासाठी समिती स्थापन करणे :-

२.१ सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने जनगणना-२०११ आणि सामाजिक-आर्थिक व जननिहाय जनगणना (ग्रामीण) यातून उपलब्ध झालेली माहिती विचारात घेऊन, हाताने काम करणारे मेहतर व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती यांचे एक सर्वेक्षण करण्यासाठी प्रकारदर्शक पध्दतीची शिफारसी करण्याकरिता आदेश क्रमांक १९०१४ /१२/ २०११ -एससीडी-चार, दिनांक ०४/०४/२०१२ अन्वये सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली असून सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाचे सचिव त्या समितीचे सह अध्यक्ष आहेत. समितीने दिनांक १३/०६/२०१२ रोजी अहवाल सादर केला असून या मंत्रालयाकडून शिफारशी स्वीकारण्यात आल्या आहेत. अशा समितीच्या शिफारशींच्या आधारावर, सर्वेक्षणविषयक मार्गदर्शक तत्त्वांना अंतिम रुप देण्यात आले आहे.

## ३. सर्वेक्षणाची उद्दिष्ट्ये व व्याप्ती :-

### ३.१ सर्वेक्षणाची उद्दिष्ट्ये :-

एक) अजूनपर्यंत मेहतर काम करीत आहेत असे मेहतर (आणि त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती-प्रौढ व अज्ञानी दोन्ही) यांची ओळख पटविणे .त्यात

अ) हाताने काम करणाऱ्या ज्या मेहतरांचा स्वयंरोजगार योजनेत समावेश करण्यात आला आहे परंतु त्यांनी प्रत्यक्षात मेहतर काम करण्याचे सोडून दिलेले नाही अशा व्यक्ती, आणि

ब) हाताने काम करणाऱ्या मेहतरांचा अद्याप स्वयं-रोजगार योजनेत समावेश करण्यात आलेला नसणे.

दोन ) हाताने काम करणारे सर्व मेहतर निश्चित करण्यात आले आहेत आणि त्याच वेळी मेहतर नसलेल्यांचा अंतर्भाव होण्याची शक्यता, जरी त्यांना वगळले नसेल तरी, कमीत कमी आहे. याची खातरजमा करणे.

तीन) हाताने काम करणारे म्हणून निश्चित केलेल्या मेहतरांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य व कौशल्यविषयक दर्जा आणि स्वयंरोजगार उपक्रम हा पर्याय स्वीकारण्याची त्यांची तयारी जाणून घेणे.

चार) अनारोग्यकारी शौचकूप, उघडी गटारे याबाबतचा तपशील निश्चित करणे व त्यावर काम करीत असलेल्या कामगारांचा तपशील निश्चित करणे इत्यादींच्या सफाई करण्यासाठी वरीलप्रमाणे सुनिश्चित करणे.

**३.२ हाताने काम करणारे मेहतर आणि सफाई कर्मचारी यांच्यामधील फरक :-**

एक) **सफाई कर्मचारी** यामध्ये सामान्यपणे महानगरपालिका, शासकीय किंवा खाजगी कार्यालये यामध्ये "सफाईगार" किंवा "स्वच्छता / सफाई कामगार " म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींच्या समावेश होतो. ते या (महानगरपालिका, शासकीय/ खाजगी क्षेत्रातील संघटना) मंडळांचे प्रत्यक्ष कर्मचारी असू शकतात किंवा कंत्राटी कर्मचारी असू शकतात, जे या संघटनांकरिता काम करतात ते सफाई कर्मचारी हे स्वत: हाताने काम करणारे मेहतर नसतात.

दोन) हाताने काम करणारे मेहतर हे बहुधा स्वंय रोजगार करणारे किंवा कंत्राटी कामगार असतात "स्वयं-रोजगार" याचा अर्थ, घर मालकांकडून रोख स्वरुपात आणि /किंवा अन्य प्रकारे रक्कम घेऊन, विशिष्ट प्रभागामधील घरांची निर्जल शौचकूपे किंवा नाल्या इत्यादींची सफाई करणाऱ्या व्यक्ती, असा आहे. कंत्राटी कर्मचारी हे सामान्यपणे जेथे मैला काढला जातो अशी वैयक्तिक किंवा सामूहिक निर्जल शौचकूपे आणि उघडया नाल्या यांची सफाई करण्यासाठी महापालिका अन्य कोणतीही संघटना किंवा घर मालकांचे गट यांनी कंत्राटदारांमार्फत भाडेतत्वावर घेतलेले कर्मचारी असतात.

**३.३ हाताने काम करणारा मेहतर व अनारोग्यकारी शौचाकूप यांची व्याख्या :-**

"हाताने काम करणारा मेहतर" याचा अर्थ, मैला पूर्णपणे कुजण्यापुर्वी अनारोग्यकारी शौचकूपामधील किंवा उघडया नाल्यातील किंवा अनारोग्यकारी शौचकूपासून मैला ज्या खड्यातून टाकला जातो तेथून मानवी मैला हाताने साफ करणारी , तो वाहून नेणारी, काढणारी किंवा अन्यथा कोणत्याही रीतीने हाताळणारी अशी एखाद्या व्यक्तीद्वारे किंवा एखाद्या स्थानिक प्राधिकरणाद्वारे किंवा सरकारी किंवा खाजगी अभिकरणाद्वारे कामावर लावलेली किंवा सेवानियुक्त केलेली व्यक्ती, असा आहे आणि "हाताने केले जाणारे मेहतरकाम " या शब्दप्रयोगाचा अर्थ तदनुसार लावण्यात येईल.

स्पष्टीकरण — (क) "कामावर लावलेले किंवा सेवानियुक्त" याचा अर्थ , नियमित पध्दतीने किंवा कंत्राटी तत्वावर कामावर लावलेली किंवा सेवानियुक्त केलेली, असा आहे ;

(ख) केंद्र सरकारने या बाबतीत अधिसूचित केल्याप्रमाणे, अशा साधनाच्या सहाय्याने व अशा संरक्षक सामग्रीचा वापर करुन मैला साफ करण्यासाठी कामावर लावलेल्या किंवा सेवानियुक्त व्यक्तीस " हाताने काम करणारा मेहतर" म्हणून मानण्यात येणार नाही;

"अनारोग्यकारी शौचकूप" याचा अर्थ, मैला पूर्णपणे कुजण्यापूर्वी, एकतर जिथल्या तिथेच किंवा जेथे मैल्याचे उत्सर्जन किंवा उध्दावन करण्यात येते, अशा उघडया नाल्यामध्ये किंवा खड्ड्यामध्ये, मानवी मैला हाताने साफ करणे किंवा अन्यथा हाताळणे आवश्यक आहे असे शौचकूप, असा आहे :

परंतु असे की, एखाद्या रेल्वे प्रवासी डब्यातील पाण्याने उध्दावन होणाऱ्या शौचकूपातील यथोचित साधनांच्या सहाय्याने (उच्च दाबाचा पाण्याचा फवारा इत्यादी सारख्या )आणि संरक्षक सामग्रीचा वापर करुन, एखादया कर्मचाऱ्याकडून सफाई करण्यात येते त्या शौचकूपाला अनारोग्यकारी शौचकूप असे मानण्यात येणार नाही.

**३.४ <u>सर्वेक्षणाची भौगोलिक व्याप्ती</u>** :- (एक) ग्रामीण सामाजिक आर्थिक व जातनिहाय जनगणना, २०११ च्या फलनिष्पत्ती अहवालाची वाट न पाहता, वैधानिक शहरांमध्ये त्वरीत प्रस्तावित सर्वेक्षण आयोजित करण्यात येईल. जेथे जनगणना, २०११ नुसार अनारोग्यकारी शौचकूप आस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले आहे अशा (४०४१-४९५= ३५४६) वैधानिक शहरांसाठी/ नगरांसाठी या सर्वेक्षणाची व्याप्ती मर्यादित असेल. <u>राज्य /संघराज्य क्षेत्रनिहाय तपशिल जोडपत्र-एक मध्ये देण्यात आला आहे. अनारोग्यकारी शौचकूपांच्या संख्येनुसार वैधानिक शहरांचे / नगरांचे प्रवर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे :-</u>

| अ.क्र. | अनारोग्यकारी शौचकूपे असलेल्या घरांची संख्या | शहरांची / नगरांची संख्या |
|---|---|---|
| १ | ० | ४९५ |
| २ | १-९९९ | ३३५१ |
| ३ | १०००-९९९९ | १८४ |
| ४ | >=१०००० | ११ |
| | **एकूण** | **४०४१** |

(दोन) ग्रामीण, सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना,२०११ मध्ये ग्रामीण भागातील हाताने काम करणाऱ्या मेहतरांची राज्य निहाय संख्या प्राप्त होईल. परंतु हाताने काम करणाऱ्या मेहतरांचे सर्वेक्षण करुन त्यांच्याविषयी जी माहिती गोळा करण्याचे उद्दिष्ट आहे ती सर्व माहिती त्यातून प्राप्त होणार नाही. (ग्रामीण) सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेची फलनिष्पत्ती प्रतीक्षित ठेवावी, जेणेकरुन ग्रामीण भागात हाताने काम करणाऱ्या मेहतरांची संख्या कळू शकेल आणि ते निश्चित होतील. त्यानंतर, या निश्चित केलेल्या ग्रामीण भागातील हाताने काम करणाऱ्या मेहतरांबाबत केवळ माहिती गोळा करण्याचे काम हाती घेण्यात येईल. <u>जे या योजनेसाठी जोडपत्र –दोन मध्ये</u>

जोडण्यात आलेल्या नमुन्यानुसार आवश्यक आहे. मात्र, ते (ग्रामीण) सामाजिक आर्थिक व जातनिहाय जनगणनेचा भाग म्हणून गोळा करण्यात येणार नाही (उदाहरणार्थ, आरोग्यविषयक स्थिती, पसंती देण्यात आलेला पर्यायी रोजगार इत्यादींवरील माहिती.)

## ४. सर्वेक्षणाची पद्धतीमीमांसा आणि प्रक्रिया

४.१ **जनजागृती मोहीम** : (एक) — सामाजिक न्याय व अधिकारिता, मंत्रालयाकडून मेहत्तर निश्चित करण्याकरिता सर्वेक्षण, त्यांच्या तारखा, इत्यादी मुद्रित व दृक् श्राव्य माध्यमे, बाह्य प्रसिध्दी इत्यादीमार्फत व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी एक माध्यम योजना तयार करण्यात येईल. माध्यम योजनेस अंतिम स्वरुप दिल्यानंतर, दूरदर्शन, आकाशवाणी आणि जाहीरात व श्राव्य् प्रसिध्दी संचालनालय, प्रसिध्दी देण्याचे काम हाती घेतील.

(दोन)- **जनजागृती मोहीम** राज्य स्तरावर आणि ३५४६ शहरांमध्ये / नगरांमध्ये आणि अनारोग्यकारक शौचकूपे असणारे त्यांचे प्राभाग यांमध्ये देखील राबविण्यात येईल. अनारोग्यकारक शौचकूपे असणाऱ्या प्रभागांची / क्षेत्रांची माहिती भारताचे महानिबंधक आणि जनगणना आयुक्त, नवी दिल्ली यांच्या कार्यालयाकडून गोळा करण्यात येईल. भारताचे महानिबंधक, राज्य शासन व जनगणना कार्यालये, प्रादेशिक संचालक यांना, जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रभाग निहाय / ईबी निहाय माहिती देण्यासाठी सुचना देण्याचीही विनंती करील. (जर भारताचे महानिबंधक यांच्याकडून आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नाही तर, संबंधित शहरस्तरीय सर्वेक्षण समिती / महानगरपालिकेचे कार्यालय, अनारोग्यकारी शौचकूपे असणारे प्रभाग / क्षेत्र निश्चित करण्यासाठी समाजातील नेते / कार्यकर्ते, सफाई कर्मचा-यांच्या कल्याणाकरीता काम करणा-या अशासकीय संघटना यांचे सहाय्य घेऊ शकेल.)

(तीन) - जनजागृती मोहीमेत मुख्यत: हाताने काम करणा-या मेहत्तरांना विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीत व अशा ठिकाणी त्यांना स्वत:ला हाताने काम करणारे मेहत्तर म्हणून घोषित करण्यासाठी आणि त्यांच्या तपशीलाची पडताळणी करण्याकरिता बोलविण्यात येईल. प्रत्येक शहरात आणि जिल्हयात, सर्वेक्षणामध्ये मोजणी व्हावी म्हणून, हाताने काम करणा-या मेहतरांच्या मदतीसाठी एक टोल फ्री हेल्पलाईनही देण्यात येईल.

४.२ **हाताने काम करणा-या मेहतरांचे स्वंयं - प्रतिज्ञापत्र** :- वरील जनजागृती मोहीमेस अनुसरुन, हाताने काम करणारे मेहत्तरांनी, विनिर्दिष्ट कालावधीत व निर्देशित केलेल्या एका ठिकाणी / अनेक ठिकाणी हाताने काम करणारे मेहत्तर म्हणून स्वंय — प्रतिज्ञापत्र / दावे दाखल करणे अपेक्षित असेल. निर्देशित केलेली ठिकाणे ही शक्यतोवर, जेथे हाताने काम करणारे मेहतर राहतात, त्या प्रभागांच्या / वस्त्यांच्या / क्षेत्रांच्या जवळ असावित. महानगरपलिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, निर्देशित केलेल्या ठिकाणी वैयक्तिक संगणकावर / हातामध्ये धरावयाच्या उपकरणावर हाताने काम करणा-या मेहतरांची माहिती नोंदवून घेण्यासाठी अधिकारी नियुक्त करील. स्थानिक प्राधिकरण (महानगरपालिका / कटक मंडळ ) (प्रगणकामार्फत) / आधारसामग्री नोंदणी (कर्मचा-यामार्फत) (डाटा एन्ट्री ऑपरेटर), हाताने काम करणा-या मेहतरांकडून माहिती घेण्यासाठी नियुक्त केलेली ठिकाणे, दिनांक व वेळा अधिसूचित करील. नियुक्त केलेल्या ठिकाणी किमान एक तरी प्रगणक / आधारसामग्री नोंदणीचा कर्मचारी (डाटा एन्ट्री ऑपरेटर) उपलब्ध असेल याची देखील

खातरजमा करुन घेण्यात येईल. भरलेला अर्जाची (जोडपत्रे - दोन) एक प्रत, उत्तरकर्तीला त्याच्या / तिच्या माहिती व अभिलेखाकरीता तत्क्षणीच देण्यात येईल.

वरील प्रमाणे नियुक्त केलेल्या ठिकाणी, हाताने काम करणा-या मेहतरांकडून स्वयं प्रतिज्ञापत्र भरुन घेण्याबरोबरच स्थानिक प्राधिकरण, योग्य त्या प्रकरणांत प्रगणकांकडून त्यांच्या हाताने काम करणा-या मेहतरांच्या वस्त्यांमध्ये धरोघरी जावून जर हाताने काम करणारे मेहतर त्यांच्या स्वत:चे प्रतिज्ञापत्र देण्यास पुढे आले नाही, प्रगणकाने घरोघरी जाऊन दिलेल्या भेटीमध्ये हाताने काम करणारा मेहतर आढळून आला नाही तर स्थानिक प्राधिकरण, योग्य प्रकरणात अनारोग्यकारक शौच कूपे असणारी घरे शोधण्याचे निदेश देऊ शकेल. प्रतिज्ञापत्र नोंद करण्यासाठी प्रत्यक्ष भेट देण्याची देखील निदेश देऊ शकेल. अशा शौचकूपांची सफाई करणा-या मेहतरांची नावे व पत्ते, त्या कुटुंबाकडून मिळवण्यात येतील. त्यानंतर प्रगणक अशा हाताने काम करणा-या मेहतरांच्या घरांना भेट देईल आणि त्यांच्या संबंधातील माहितीची विहित केलेल्या नमुन्यात नोंद घेईल.

हाताने काम करणा-या मेहतरांबाबतची माहिती स्थानिकरीत्या काम करणा-या अशासकीय संघटनांकडूनही उपलब्ध करुन घेता येईल. अशासकीय सघटनांनी थेट राज्य शासनाला दिलेल्या किंवा केंद्र सरकारने राज्य शासनाला पाठविलेल्या, हाताने काम करणा-या मेहतरांच्या यादीची पडताळणी सर्वेक्षणाच्या वेळी प्रगणाकडून करण्यात येईल. पडताळणी केल्यानंतर जर अशी व्यक्ती, हाताने काम करण्या-या मेहतरांचे काम करत नसल्याचे आढळून आल्यास, त्याबाबतचा तपशीलही प्रगणकाकडून नोंदवण्यात येईल. आणि त्याबाबतची नोंद स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यालयात ठेवण्यात येईल.

४.३ <u>प्रगणकांकडून शंभर टक्के पडताळणी</u> :- हाताने काम करणा-या मेहतरांनी निश्चित केलेल्या ठिकाणी स्वंय-प्रतिज्ञापत्रातील माहिती भरल्यानंतर अशा प्रत्येक प्रतिज्ञापत्राची प्रगणकाकडून पडताळणी करण्यात येईल. हा प्रगणक सर्व साधारणपणे महानगरपालिकेचा किंवा राज्य शासनाचा कर्मचारी असेल. प्रगणक हाताने काम कराणा-या मेहतराच्या घरी जाऊन भेट देईल आणि माहिती स्वयं-प्रतिज्ञापत्र देण्याची वेळी त्याच्या वैयक्तिक संगणकात / हातामध्ये धरावयाच्या उपकरणात / नोंदवण्यात आली होती त्या माहितीची पडताळणी करील. जर स्वयं-प्रतिज्ञापत्रतील कोणतीही माहिती चुकीची आहे असे प्रगणकास आढळून आले तर तो त्याच ठिकाणी त्या माहितीची पडताळणीनंतर नोंद करील. प्रगणकाने नोंदवलेली माहिती घोषणा करणा-या समोर उघड करण्यात येणार नाही.

४.४ <u>पर्यवेक्षकांकडून नमुन्या दाखल तपासणी</u> :- प्रगणकांकडून केलेल्या कामाची नमुना दाखल तपासणी या प्रयोजनार्थ स्थानिक प्राधिका-यांकडून पदनिर्देशित केलेल्या पर्यवेक्षकांकडून, पुढे दर्शविल्याप्रमाणे, सरसकट / यादृच्छिक निवडीच्या आधारे करण्यात येईल.

(एक) अनारोग्यकारी शौचकूपांसह १००० पेक्षा कमी घरे असलेल्या ३३५१ शहरांमधील / नगरांमधील घरांची १००% तपासणी करण्याचे काम पार पाडले जाईल.

(दोन) अनारोग्यकारी शौचकूपांसह १००० ते ९९९९ पर्यंत घरे असलेल्या १८४ शहरांमध्ये / नगरांमध्ये प्रत्येक प्रगणकाने पडताळणी करुन जाहीर केलेल्या ५०% घरांची तपासणी करण्यात येईल.

(तीन) वरील प्रकारच्या १०,००० किंवा त्याहून अधिक घरे असलेल्या ११ शहरांमध्ये /नगरांमध्ये प्रत्येक प्रगणकाने पडताळणी करुन जाहीर केलेल्या ३३% घरांची तपासणी करण्यात येईल.

प्रवर्ग (दोन) व (तीन) यामध्ये, कोणत्याही प्रगणकाने केलेल्या कामाची नमुना तपासणी केली असता >१०% चुका दिसुन आल्या तर पर्यवेक्षकांकडून त्याच्या कामाची १००% तपासणी पार पाडली जाईल.

४.५ **हाताने काम करणा-या मेहतरांची मसुदा सुची तयार करणे व ती प्रसिध्द करणे :-** प्रत्येक शहर / नगरातील निश्चित केलेली हाताने काम करणा-या मेहतरांची व पर्यवेक्षकाने पडताळणी केलेली मसुदा सुची संबंधित स्थानिक प्राधिकरणाव्दारे स्थानिक वृत्तपत्रामधून प्रसिध्द करण्यात येईल व ती त्यांच्या स्वत:च्या कार्यालयात व स्थानिक तहसीलदार व उपविभाग अधिकारी (तसेच, जिल्हा मुख्यालय किंवा शहराच्या बाबतीत जिल्हाधिकारी कार्यालयात ) यांच्या कार्यालयात लावण्यात येईल. मसुदा सूचीची एक प्रत स्थानिक प्राधिकरणाच्या व नगर पातळीवर सर्वेक्षण समितीच्या सदस्यांना देखील उपलब्ध करुन देण्यात येईल. मसुदा सूची प्रसिध्द करते वेळी, स्थानिक प्राधिकरणास, लोक सदस्यांना ही सूची लक्षात घेऊन त्याबाबतचे दावे व आक्षेप दोन आठवड्यांच्या आत विहित नमुन्यात दाखल करण्याची विनंती करता येईल..

४.६ **मसुदा सुचीबाबत दावे व आक्षेप दाखल करणे** :- वरील दोन आठवड्यांच्या कालावधीच्या आत दावे व आक्षेप स्वीकारले जातील. दावेदारास किंवा आक्षेप घेणा-या व्यक्तीस त्याच्या / तिच्या दाव्याबरोबरच त्याबाबतचे कागदोपत्री पुरावे देखील जोडता येतील. दावे व आक्षेप दाखल करण्यासाठीचे नमुने, अर्जदारास निर्देशित ठिकाणी (अनेक ठिकाणी) मागणी केल्यास नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात येतील. तसेच ते जिल्हा / स्थानिक प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध होतील. संबंधित जिल्हाधिकारी प्राप्त झालेल्या दाव्यांची व आक्षेपांची चौकशी करण्यासाठी व त्यावर आपला निष्कर्ष देण्यासाठी तहसिलदार / गट विकास अधिकारी यांच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या अधिका-यांना अधिसूचित करील. अशा अधिका-यांकडून संक्षिप्त सुनावणी घेण्यात येईल. आवश्यकता असल्यास, ते योग्य त्या पदाधिका-यांना नवीन पडताळणी करण्याचा देखील आदेश देतील. संक्षिप्त सुनावणी केल्यानंतर व (आदेश देण्यात आला असल्यास) अशी आणखी पडताळणी केल्यानंतर अधिकारी, दावा / आक्षेप, स्वीकारण्याचा किंवा यथास्थिती फेटाळण्याचा समुचित आदेश देईल. अशा आदेशाची एक प्रत संबंधित व्यक्तीला देण्यात येईल.

४.७ **हाताने काम करण्या-या मेहतरांची अंतिमसूची प्रसिध्द करणे** :-समुचित अधिका-याने दावे व आक्षेप मिटवल्यानंतर, स्थानिक प्राधिकारी मसुदा सूचीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्याचे काम पार पाडील व तिला अंतिम रुप देण्यासाठी ती नगर पातळीवरील सर्वेक्षण समितीकडे पाठवील. नगर पातळीवर सर्वेक्षण करण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या कामाविषयी व

त्याआधारे तयार केलेल्या अंतिम सूची बाबत समाधान झाल्यास ती प्रसिध्द करण्यास मान्यता मिळावी म्हणून जिल्हा पातळीवरील सर्वेक्षण समितीकडे पाठवली जाईल. जिल्हा पातळीवरील सर्वेक्षण समितीने मान्यता दिल्यावर, ती महानगरपालिका, तहसिलदार यांच्या कार्यालयात संबंधीत उपविभागीय व जिल्हा कार्यालयाल आणि स्थानिक वृत्तपत्रे इत्यांदीमध्ये यथोचितरीतीने प्रसिध्द करण्यात येईल. अंतिम सूची जिल्हा व राज्य शासनाच्या संकेत स्थळावरदेखील उपलब्ध करुन देण्यात येईल.

४.८ **जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर हाताने काम करणा-या मेहतरांच्या अंतिम सूच्यांचे संकलन** :- नगर पातळीवरील सर्वेक्षण समिती, हाताने काम करणारे निश्चित केलेले मेहतर यांची सूची, अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली सूची जिल्हा पातळीवरील सर्वेक्षण समितीला सादर करील. जिल्हा पातळीवरील सर्वेक्षण समिती, प्रत्येक नगरातून प्राप्त झालेल्या हाताने काम करणा-या मेहतरांच्या सूच्यांचे संकलन करील व जिल्ह्यासाठीची हाताने काम करणा-या मेहतरांची एकत्रित सूची तयार करील. जिल्ह्यांचा जिल्हाधिकारी ती सूची सर्वेक्षणासाठी राज्याच्या मध्यवर्ती विभागाकडे, विविध जिल्ह्यांकडून आलेल्या हाताने काम करणा-या मेहतरांच्या सूच्या असतील. त्या संकलित करण्यात येतील व राज्य सर्वेक्षण समितीच्या विचारार्थ व मान्यतेसाठी पाठविण्याकरीता हाताने काम करण्या-या मेहतरांची राज्याची एकत्रित राज्यसूची तयार करण्यात येईल. यास मान्यता मिळाल्यावर, राज्य मध्यवर्ती विभाग, सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयास एकत्रित राज्य सूची पाठवील. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय हाताने काम करणा-या मेहतरांची राष्ट्रीय पातळीवरील सूची संकलित करील आणि राष्ट्रीय पातळीवरील सर्वेक्षण समितीची सूचीला मान्यता प्राप्त झाल्यावर ती प्रसिध्द करील.

४.९ **नगर(शहर), जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवरील विश्लेषणात्मक अहवाल तयार करणे** :- नगर, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय पातळीवर हाताने काम करणा-या मेहतरांच्या सूच्यांना अंतिम रुप दिल्यावर स्थानिक संस्था, जिल्हाधिकारी, राज्य शासन/ संघराज्य क्षेत्राचे प्रशासन, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, संबंधित सूच्यांचा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून जसे स्त्री/पुरुष, भौगोलिक ठिकाण, त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थिती व त्यांच्याकडे असलेले कौशल्य, पर्यायी व्यवसाय करण्याविषयी हाताने काम करण्या-या मेहतरांच्या आशा-आकांक्षा इत्यादींचे विश्लेषण करणारे अहवाल देखील तयार करील व ते प्रसिध्द करील. हे कार्य ते स्वत: हाती घेऊ शकतील किंवा या प्रयोजनासाठी विशेषीकृत एजन्सी नेमू शकतील.

५. **सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी ठरवून दिलेली वेळ :-**

खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार सुमारे साडे तीन महिन्यांत सर्वेक्षण करण्यात यावे.

| अ. क्र. | दिनांक (दिवस संख्या) | कृति कार्यक्रम-१ | कृति कार्यक्रम-२ | कृति कार्यक्रम-३ |
|---|---|---|---|---|
| १. | दि.१९/०२/२०१३ | राज्य पदाधिकाऱ्यांचे दिशानिदेश | राज्यांना सर्वेक्षण नियम पुस्तिका, माहिती नोंद करणारे सॉफ्टवेअर, प्रसिध्दी साहित्य देणे. | |
| २. | दि.२०/०२/२०१३ | राज्यांना /संघराज्य क्षेत्रांना सल्लागार उपलब्ध करुन देणे, त्यांना सर्वेक्षण व मार्गदर्शक तत्त्वांची माहिती करुन देणे. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | दि.२०/०२/२०१३ ते दि.०६/०३/२०१३ (१४ दिवस) | • जिल्हा व नगर स्तरावरील संबधित अधिकाऱ्यांचे दिशानिदेश<br>• आधार सामग्री नोंदणी कर्मचारी प्रगणक, पर्यवेक्षक यांच्या संख्यात्मक आवश्यकतेचे निर्धारण व जिल्हा / नगर स्तरीय अधिकाऱ्यांकडून त्यांची निवड<br>• स्वयं प्रतिज्ञापत्र करावयाच्या केंद्राच्या आवश्यक संख्येबाबत निर्धारण, त्या केंद्रासाठी योग्य स्थानांची निवड<br>• कुशल प्रशिक्षक बनण्यासाठी योग्य संख्येने उमेदवार निवडणे व त्यांना पुरस्कृत करणे<br>• दिनांक ६/०३/२०१३ रोजी भारत सरकारकडून दिल्ली येथे आयोजित होणारे कुशल प्रशिक्षकांचे प्रशिक्षण | •स्थानिक भाषेतील अनुवाद ,छपाई यांसह प्रसिध्दी विषयक सामग्री तयार करणे आणि ती जिल्ह्यांना /नगरांना पाठविणे.<br>•सर्वेक्षण मार्गदर्शक तत्वे नियम पुस्तिका, नमुने यांचा अनुवाद करणे व आवश्यक संख्येने त्यांची छपाई करणे आणि ते जिल्ह्यांना / नगरांना पाठविणे.<br>• जेथे आवश्यक असेल तेथे प्रणाली (सॉफ्टवेअर) नियम पुस्तिकेचा प्रादेशिक भाषेत अनुवाद करणे. | •राज्य, जिल्हा व नगर स्तरावर समित्यांची रचना |
| ४. | दि.७/०३/२०१३ ते दि.१९/०३/२०१३ (१३ दिवस) | • आधारसामुग्री नोंदणी कर्मचारी ,प्रगणक व पर्यवेक्षक यांची नियुक्ती व त्यांचे प्रशिक्षण.<br>•स्वयं प्रतिज्ञापत्र करावयाचे केंद्र (केंद्रे) यांसाठी एका अधिकाऱ्यांची नियुक्ती<br>• तक्रारी व हरकती स्वीकारण्यासाठी पदनिर्देशित अधिकाऱ्यांची नियुक्ती<br>• स्थानिक प्रसिध्दी | • आवश्यक साधने, लेखनसामग्री, फर्निचर इत्यादींसह संगणकाची व्यवस्था करुन स्वयं प्रतिज्ञापत्र करावयाच्या केंद्राची स्थापना करणे. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | दि.२०/०३/२०१३ ते दि.२६/०३/२०१३ (सुट्यांसह ७ दिवस) | निर्दिष्ट केलेल्या केंद्रावर स्वयं प्रतिज्ञापत्रे सादर करणे | | |
| ६. | दि.२७/०३/२०१३ ते दि.०३/०४/२०१३ (७ दिवस) | •अशासकीय संघटनेद्वारे दिलेल्या यादीच्या आधारे, मेहतर हाताने काम करणारा असल्याने क्षेत्रात जाऊन सर्वेक्षण करणे आणि भारताचे महानिबंधक यांच्या प्रभागनिहाय माहितीच्या आधारे, अनारोग्यकारी शौचकूप मोठया प्रमाणात एकत्रित असलेले क्षेत्र पुन: निश्चित करणे . | •सर्वेक्षणातून प्राप्त झालेल्या माहितीचा संग्रह करणे आणि ती एकरुप करणे व जिल्हा एनआयसी (NIC) केंद्राच्या संगणकावर माहिती साठविणे. | |
| ७. | दि.०४/४/२०१३ ते दि.१०/४/२०१३ (०७ दिवस) | •प्रगणकाद्वारे पडताळणी. | •प्रगणकाद्वारे केलेल्या पडताळणीच्या आधारे, माहितीचे अद्ययावतीकरण. | |
| ८. | दि.११/४/२०१३ ते दि.१७/४/२०१३ (०७ दिवस) | •पर्यवेक्षकांद्वारे नमुना तपासणी. | पर्यवेक्षकांद्वारे केलेल्या पडताळणीच्या आधारे, माहितीचे अद्ययावतीकरण. | |
| ९. | दि.१८/०४/२०१३ ते दि.०१/०५/२०१३ (१४ दिवस) | •सोडून गेलेल्या व्यक्तींची नव्याने नाव नोंदणी / त्याबाबत हरकती मागविणे आणि मसुदा सूची तयार करणे. | • हरकती/ नाव नोंदणी झालेल्या व्यक्तींची पडताळणी. | •हरकती/ नवीन नाव नोंदणीच्या आधारे माहितीचे अद्ययावतीकरण. |
| १०. | दि.०२/०५/२०१३ ते दि.२९/०५/२०१३ | नगर (शहर), जिल्हे, राज्ये व राष्ट्रीय सर्वेक्षण अहवाल तयार करणे व त्याचे विश्लेषण करणे व माहिती विधीग्राह्य करणे. | | |

## ६. सर्वेक्षण करण्यासाठी संस्थात्मक उभारणी :-

६.१ <u>सर्वेक्षणाकरिता विविध स्तरांवरील कार्यकारी जबाबदारी पुढील प्रमाणे असेल :-</u>

| अ.क्र. | स्तर | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय स्तर | केंद्र सरकार (सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय हे मध्यस्थ (नोडल) मंत्रालय असेल, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय व भारताचा महानिबंधक हे तांत्रिक भागीदार असतील.) |
| २ | राज्य स्तर | राज्य शासन (प्रत्येक राज्य शासनाने नोडल विभाग आणि एक सहयोगी विभाग नियुक्त करावा.) |

| | | |
|---|---|---|
| ३ | जिल्हा | जिल्हाधिकारी (संबंधित विभागाच्या जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांच्या सहाय्याने ) |
| ४ | नगर / शहर | महानगरपालिका / नगरपालिका प्रकरणपरत्वे कटक मंडळ यांचे आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी- जशी बाब असेल त्याप्रमाणे. |

६.२ **प्रत्येक कार्यकारी अभिकरण आपल्या स्तरांवर पुढील कामे पार पाडील :-**

(एक) जनजागृती मोहीम

(दोन) विविध कामांसाठी अधिकारी /मनुष्यबळ नेमणे/ पदनिर्देशन करणे.

(तीन) वरील पदाधिकाऱ्यांना दिशा निदेशन करणे.

(चार) नमूने तयार करणे/त्यांचे मुद्रण करणे (छापणे)

(पाच) आधारसामग्री गोळा करणे आणि त्यांची वैधता व संकलन करणे.

(सहा) सर्वेक्षण वेळेत पूर्ण करणे आणि हाताने काम करणाऱ्या मेहतराच्या अंतिम यादीचे प्रकाशन करणे.

६.३ **सर्वेक्षण समितीची रचना :-**

- कार्यकारी अभिकरणांच्या वरील कामाचे पर्यवेक्षण करणे.
- सर्वेक्षणाच्या दरम्यान सर्व संबंधित विभाग/अभिकरणे यांच्यांमध्ये समन्वय साधणे.
- सर्वेक्षणाच्या कामामध्ये नागरी समाजाच्या /लाभार्थ्यांच्या सहभागाची सुनिश्चिती करणे, आणि
- सर्वेक्षणविषयक आधारसामग्री विधीग्राह्य करणे, यांकरिता
- सर्वेक्षण समितीची रचना जोडपत्र-तीन प्रमाणे असेल.

७. **महत्वाच्या कार्ययंत्रणांसाठी प्रशिक्षण, उदबोधन व दिशानिदेशन :-**

सर्वेक्षण पध्दतीशी परिचित होण्यासाठी महत्त्वाच्या कार्ययंत्राणामधील पदाधिकाऱ्यांना एक दिवशीय प्रशिक्षण, दिशा निदेशन, उदबोधन कार्यक्रम पुढील प्रमाणे विविध स्तरांवर आयोजित करण्यात येईल :-

| **महत्वाच्या पदाधिकाऱ्यांचा स्तर** | **प्रशिक्षण, दिशा निदेशन व उदबोधना बाबतची कार्यवाही अपेक्षित असलेला स्तर** |
|---|---|
| राज्य | राष्ट्रीय |
| जिल्हा | राज्य |
| शहर | जिल्हा |

**८. प्रगणक आधारसामग्री, नोंदणी कर्मचारी (डेटा एंट्री ऑपरेटर) व पर्यवेक्षक यांची संख्या निर्धारित करणे व त्यांची नियुक्ती करणे :-**

प्रत्येक स्थानिक संस्था प्रगणक व पर्यवेक्षक यांची आवश्यक संख्या निर्धारित करील, आणि त्यासाठी स्वतःच्या कर्मचा-याची आणि किंवा राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती करील. आवश्यकतेनुसार पुरेशा संख्येने आधारसामग्री नोंदणी कर्मचाऱ्यांची (डेटा एंट्री ऑपरेटर्स) नियुक्ती करता येईल.

**९. प्रगणक आधारसामग्री नोंदणी कर्मचारी(डेटा एंट्री ऑपरेटर्स) व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण :-**

प्रत्येक स्थानिक संस्था जिल्हाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, प्रगणक आधारसामग्री नोंदणी कर्मचारी (डेटा एंट्री ऑपरेटर्स) व पर्यवेक्षक यांच्याकरिता, सर्वेक्षण पध्दत, हाताने काम करणाऱ्या मेहतरांचे प्रपत्र भरणे, पडताळणी करण्याची कार्यपध्दत, इत्यादी संबंधात, एक दिवशीय दिशानिदेशन / प्रशिक्षण, कार्यक्रम आयोजित करील.

**१०. राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर कक्ष निर्माण करणे :-**

१०.१ सामाजिक न्याय व रोजगार मंत्रालयामध्ये डिडीजी (सांख्यिकी) अंतर्गत पुढील मनुष्यबळानिशी एक कक्ष निर्माण करण्यात येईल :-

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या |
|---|---|---|
| १ | सल्लागार म्हणून व्यावसायिक सर्वेक्षण सांख्यिकी * | १ |
| २ | संचालक | १ |
| ३ | सह संचालक | १ |
| ४ | सांख्यिकी | २ |
| ५ | आधारसामग्री नोंदणी कर्मचारी (डाटा एंट्री ऑपरेटर) | ४ |
| | <u>एकूण</u> | ९ |

वरील कक्ष पुढील कामांमध्ये समन्वय साधेल :-

- तांत्रिक निविष्टि पुरविणे, सर्वेक्षणासाठी तपशिलवार मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, विविध स्तरांवरील प्रशिक्षणासाठी मॉड्युल्स् व प्रसिध्दीचे साहित्य तयार करणे.
- राज्य स्तरीय अधिकाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे.
- राज्य व जिल्हा स्तरावरील सर्वेक्षण सुरळीतपणे पार पाडण्यासाठी त्यावर देखरेख ठेवणे व त्याबाबतची सुनिश्चिती करणे.
- राज्यांकडून प्राप्त झालेल्या अहवालांचे संकलन, विधीग्राह्यता, छाननी व पडताळणी करणे, आणि राष्ट्रीय स्तरावरील याद्या व सर्वेक्षणावरील अहवाल तयार करणे.

१०.२ राज्य शासन / संघराज्य क्षेत्र प्रशासन वरील परिच्छेद १०.१ मध्ये नमूद केलेली कामे पार पाडण्यासाठी योग्य त्या फेरफारासह, त्यांच्या स्तरावर तशाच प्रकारचा एक कक्ष निर्माण करील. राज्य-स्तरीय कक्षावरील खर्च भागविण्यासाठी राज्य/ संघराज्य क्षेत्राचा आकार पाहून योग्य त्या प्रमाणात राज्यांना केंद्रीय सहाय्य देण्यात येईल. राज्ये/ संघराज्य क्षेत्रे यांच्या सरासरी खर्चाचे प्रमाण हे प्रतिवर्षी रुपये १० लाख एवढे असू शकेल.

## ११. आधारसामग्री प्रक्रियेचे काम बाहय अभिकरणांना देणे (आऊटसोर्सिंग):-

राष्ट्रीय स्तरावरील आधारसामग्री प्रक्रिया करण्याचे काम हे सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, यांच्याकडून नामवंत अभिकरणांना देऊन त्यांच्याकडून करण्यात येईल. राज्य, जिल्हा व स्थानिक स्तरांवर, राज्य शासन, आधारसामग्री प्रक्रिया आणि अहवालांचे विश्लेषण व संकलन यांसाठी उपलब्ध माहिती, तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधांची उपयोगिता सुलभ करतील. राज्ये, राष्ट्रीय माहिती केंद्र, जिल्हा माहिती केंद्र यांच्या माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा किंवा राज्य शासनाच्या अन्य माहिती तंत्रज्ञानाच्या पायाभूत सुविधा वापरु शकतील.

## १२. <u>अंदाजित वित्तीय भार</u>

अंतर्भूत असलेल्या कामाच्या परिमाणावरील माहिती उपलब्ध नसल्याने प्रस्तावित सर्वेक्षणाच्या वित्तीय भारांचा अचूक अंदाज घेणे अवघड आहे. तथापि, ३५४६ वैधानिक शहरांमध्ये सर्वेक्षण पार पाडण्याच्या खर्चाचा प्राथमिक अंदाज हा रु. १८.५० कोटी एवढा आहे. सर्वेक्षणाची तत्सम वित्तीय मानके ही खाली दिलेल्या तपशीलानुसार आहेत.

(रक्कम कोटीत)

| अ. क्र. | कार्यक्रम | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १. | राष्ट्रीय व राज्य स्तरीय प्रसार माध्यम मोहीम | ३.०० |
| २. | जिल्हा व शहर स्तरावर जनजागृती मोहीम, प्रति जिल्हा रुपये १ लाख × ६०० जिल्हे | ६.०० |
| ३. | (एक) राज्य / संघ राज्य क्षेत्रे यांनी सूचना नियम पुस्तिका व सर्वेक्षण नमुने यांचा स्थानिक भाषेत अनुवाद करणे.<br>(दोन) ५००० सूचना नियम पुस्तिका व ३.५० लाख नमुने यांना स्थानिक भाषेत अंतिम रुप देणे व त्यांची छपाई करणे.<br>सूचना व नियम पुस्तिका नमुना यांना<br>रु. ५० या दराने × ३.५५ लाख (१०% अपव्ययासह) | १.८० |
| ४. | राज्य व जिल्हा स्तरीय अधिका-यांचे दिशानिर्देशन | ०.४० |
| ५. | प्रगणक आधारसामग्री नोंदणी कर्मचारी (डाटा एंट्री ऑपरेटर) व पर्यवेक्षक यांचे दिशानिदेशन | १.०० |
| ६. | ५ जिल्ह्यांमध्ये नमुन्यांची व पथ सर्वेक्षणाची पूर्वचाचणी | ०.५० |
| ७. | प्रगणक व अधारसामग्री नोंदणी कर्मचारी (डाटा एंट्री ऑपरेटर) यांना मानधन रुपये १०००×२४०० प्रगणक व २४०० आधारसामग्री नोंदणी कर्मचारी (डाटा एंट्री ऑपरेटर) पर्यवेक्षकांना मानधन रुपये २००० या दराने × १६०० पर्यवेक्षक | ०.४८<br>०.३२ |

| | | |
|---|---|---|
| ८. | राज्ये / संघराज्य क्षेत्रे येथे कक्षांची निर्मिती प्रति राज्य / संघराज्य क्षेत्र रुपये १० लाख × ३० | ३.०० |
| ९. | मंत्रालयातील कक्षाची निर्मिती<br>(एक) आवर्ती ०.५<br>+<br>(दोन) अनावर्ती ०.५ | १.०० |
| १०. | माहिती प्रक्रियाचे काम बाहेरील अभिकरणांना देणे. | १.०० |
| | **एकूण** | १८.५ |

राज्य शासनाने असे सर्वेक्षण हाती घेण्यास संमती दिल्यानंतर लगेच वर दिलेल्या मानकांचा वापर करुन, शासन केंद्रीय सहाय्य मिळविण्यासाठी प्रस्ताव तयार करील, ते राज्य स्तरीय महामंडळ किंवा अन्य स्वायत्त मंडळ देखील नियुक्त करील. ज्याला या प्रयोजनासाठी केंद्रीय निधी देण्यात येईल. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय प्रस्तावाची तपासणी करील आणि एनएसकेएफडीसीच्या मार्फत अशा नियुक्त केलेल्या मंडळाला केंद्रीय सहाय्याचा हक्क असलेला ७५ टक्के इतक्या मर्यादेपर्यंतचा निधी देईल. राज्यस्तरीय मंडळ, राज्यस्तरीय सर्वेक्षण समितीच्या मंजुरीच्या आधारे, नगरपालिका व जिल्हा पंचायत, इत्यादींना पाळीपाळीने हे सहाय्य देईल. या केंद्रीय अनुदानासाठी उपयोगिता प्रमाणपत्र हे, स्थानिक संस्थाव्दारे जिल्हा स्तरावरील मंडळाकडे जिल्हा मंडळाव्दारे राज्यस्तरीय मंडळाकडे व त्यांच्याकडून एनएसकेएफडीसीकडे पाठविण्यात येईल. अशा निधीच्या उर्वरित २५ टक्के निधी हा , पहिला हप्ता म्हणून देण्यात आलेल्या निधीच्या कमीत कमी ५० टक्के इतक्या मर्यादेपर्यंत नियतकालिक उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर देण्यात येईल.

## जोडपत्र- "एक"

नगरातील / शहरातील अनारोग्यकारी शोचकूप (४०४१) असणारी राज्य / संघराज्य क्षेत्रनिहाय एकूण घरे जनगणना, २०११.

| अ. क्र. | राज्य / संघराज्य क्षेत्र | वैधानिक शहरांची संख्या | वैधानिक शहरातील अनारोग्यकारी शौचालये असलेली एकूण घरे | | | एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | उघडया नाल्यामध्ये टाकलेला मैला | माणसाकरवी टाकला जाणारा मैला | एकूण | |
| १. | उत्तरप्रदेश | ६४८ | ९२,८१९ | १००,६३४ | १९३,४५३ | १८.२ |
| २. | तामिळनाडू | ७२१ | १२८,०९७ | १३,७९४ | १४१,८९१ | १३.४ |
| ३. | आंध्र प्रदेश | १२५ | १३१,६२१ | ४,१२७ | १३५,७४८ | १२.८ |
| ४. | महाराष्ट्र | २५६ | १२९,१३८ | ४,९९६ | १३४,१३४ | १२.६ |
| ५. | राजस्थान | १८५ | ८२,९३१ | १,४२० | ८४,३५१ | ८.० |
| ६. | जम्मु व काश्मीर | ८६ | ५३,९३५ | १४,४०५ | ६८,३४० | ६.४ |
| ७. | कर्नाटका | २२० | ५०,७१४ | ५,५८१ | ५६,२९५ | ५.३ |
| ८. | दिल्ली एनसीटी | ३ | ५२,५५० | ५८३ | ५३,१३३ | ५.० |
| ९. | मध्यप्रदेश | ३६४ | २९,८८२ | २,६१४ | ३२,४९६ | ३.१ |
| १०. | हरियाणा | १२९ | २५,५६९ | ६०७ | २६,१७६ | २.५ |
| ११. | पश्चिम बंगाल | ८० | १४,०९७ | ६,४६५ | २०,५६२ | १.९ |
| १२. | ओरिसा | १०७ | १२,३५७ | ६,५११ | १८,८६८ | १.८ |
| १३. | गुजरात | १९५ | १६,०३८ | १,११९ | १७,१५७ | १.६ |
| १४. | पंजाब | १४३ | १५,८६३ | ७७५ | १६,६३८ | १.६ |
| १५. | बिहार | १३९ | १०,०६४ | ३,७३८ | १३,८०२ | १.३ |
| १६. | मणिपूर | २८ | ९,५८० | २,७६४ | १२,३४४ | १.२ |
| १७. | आसाम | ८८ | ५,१८३ | ५,०२५ | १०,२०८ | १.० |
| १८. | उत्तराखंड | ७४ | ४,५६९ | ९३० | ५,४९९ | ०.५ |
| १९. | झारखंड | ४० | ४,५९४ | ४९८ | ५,०९२ | ०.५ |
| २०. | केरळ | ५९ | ३,५५४ | ८४३ | ४,३९७ | ०.४ |
| २१. | छत्तिसगढ | १६८ | ३,३५४ | १४८ | ३,५०२ | ०.३ |
| २२. | हिमाचल प्रदेश | ५६ | २,०३९ | - | २,०३९ | ०.२ |
| २३. | त्रिपुरा | १६ | १,६१३ | १०८ | १,७२१ | ०.२ |
| २४. | पाँडेचरी | ६ | ५४७ | १०८ | ६५५ | ०.१ |
| २५. | मिझोरम | २३ | ५०६ | १४ | ५२० | ०.० |
| २६. | नागालँड | १९ | ३९९ | १०८ | ५०७ | ०.० |
| २७. | मेघालय | १० | १६३ | २८१ | ४४४ | ०.० |
| २८. | अरुणाचल प्रदेश | २६ | २३० | १०० | ३३० | ०.० |
| २९. | गोवा | १४ | २२० | - | २२० | ०.० |
| ३०. | सिक्किम | ८ | १५ | - | १५ | ०.० |
| ३१. | चंदीगड | १ | ११ | - | ११ | ०.० |
| ३२. | दमण व दिव | २ | ९ | - | ९ | ०.० |
| ३३. | अंदमान,निकोबार बेटे | १ | ९ | - | ९ | ०.० |
| ३४ | दादरा नगर हवेली | १ | १ | - | ९ | ०.० |
| ३५. | लक्षद्विप | ० | ० | ० | ० | ०.० |
| एकूण | | ४०४१ | ८८२,२७१ | १७८,२९६ | १,०६०,५६७ | १००.०० |

**जोडपत्र- "दोन"**

## सर्वेक्षण नमुना

हाताने काम करणाऱ्या मेहतरांची ओळख

| |
|---|
| |

(कार्यालयीन वापर)

• राज्याचे नाव :-

• जिल्हा :-

• नगरपालिका :- __________ शहर __________ प्रभाग __________

| हाताने काम करणाऱ्या मेहतराचे छायाचित्र |
|---|

| हाताने काम करणाऱ्या मेहतराच्या कुटुंबाचे छायाचित्र (६" x ४" च्या पोस्ट कार्ड आकाराचे छायाचित्र ) |
|---|

---

१. हाताने काम करणाऱ्या मेहतराचे नाव :- ----------------------------------------

२. वडील/ आई / पती किंवा पत्नीचे नाव :- ----------------------------------------

३. वय :- ---------------

४. लिंग :- पुरुष ☐ स्त्री ☐

५. शैक्षणिक दर्जा (योग्य रकान्यात √ अशी खूण करा)

(एक) क) शिक्षित ☐ ख) अशिक्षित ☐

(दोन) शिक्षित असल्यास, शिक्षणाचा स्तर :-

क) शिक्षण :- वर्ग १-५ ☐ वर्ग ६-१० ☐ वर्ग ११-१२ ☐

१२ वी पुढील शिक्षण ☐

६. व्यवसाय

(एक) अनारोग्यकारी शौचकूपातील मानवी मैला हाताने वाहून नेणे/ त्याची विल्हेवाट लावणे/ स्वच्छता करणे ☐

(दोन) खाली नमूद ठिकाणचा संस्करण न केलेला मैला हाताने साफ करणे .

(क) उघडया नाली ☐

(ख) रेल्वे मार्ग (ट्रॅक) ☐

(ग) खड्डा शौचकूप ☐

७. सेजगाराची स्थिती :-

(एक) सेवेत असल्यामध्ये :-

(क) खाजगी :-

(१) एकल कुटुंब ☐ (२) सामूहिक /गट कुटुंबे ☐ (३) कंत्राटदार ☐

(४) रुग्णालय कार्यालय सारख्या संस्था ☐ (५) इतर (नमूद करा) ☐

(ख) केंद्र सरकार :- ☐ (ग) राज्य शासन :- ☐ (घ) महानगरपालिका :- ☐

(दोन) खालील प्रमाणे नियुक्ती :-

(क) कायम तत्वावरील ☐ (ख) तात्पुरत्या तत्वावरील ☐

(ग) कंत्राटी तत्वावरील ☐ (घ) जनमानी तत्वावरील ☐

८. आपण या व्यवसायात केव्हापासून आहात :- ------------------------------------------------

९. सामाजिक पार्श्वभूमि :-

(क) अजा./अज./इमाव./इतर या प्रवर्गाचे आहात का ? ☐

(ख) जात :- ☐ (ग) उपजात :- ☐ (घ) धर्म :- ☐

१०. (क) आपणाला शासनाच्या पुनर्वसन योजनेचा कोणताही लाभ मिळाला आहे का ?
(योग्य चौकटीत √ अशी खूण करा.)

| होय | नाही |
|---|---|
| | |

(ख) होय. असल्यास, योजनेचे नाव (योग्य चौकटीत √ अशी खूण करा)

| अ.क्र. | योजनेचे नाव | रुपये |
|---|---|---|
| १. | मेहतरांना नेहमीच्या कामातून सूट व त्यांचे पुनर्वसन याकरिता (एन.एस. एल. आर. एस.) राष्ट्रीय योजना | |
| २. | हाताने काम करणाऱ्या मेहतरांच्या पुनर्वसनाकरिता स्वयंरोजगार योजना (एस.आर. एम. एस.) | |
| ३. | इतर कोणत्याही (कृपया योजनेचे/ योजनांचे नाव/नावे नमूद करावीत) | |

(ग) होय असल्यास, प्रकल्पाला वरील योजनेमार्फत निधी मिळतो का ?

| होय | नाही | होय असल्यास मासिक उत्पन्न (रुपयात) |
|---|---|---|
| | | |

११. (क) मेहतर कामाव्यतिरिक्त तुम्ही इतर व्यवसायात कामावर आहात का ?

होय ☐ नाही ☐

(ख) होय असल्यास नमूद करा :---------------------

१२. आपल्याला येत असलेले इतर कोणतेही व्यवसाय कौशल्य :-

(एक) बांधकाम ☐ (दोन) सुतारकाम ☐

(तीन) वाहन चालवणे ☐ (चार) स्वयंपाक ☐

(पाच) शिंपीकाम ☐ (सहा) इतर कोणतेही (नमूद करा) ☐

१३. प्रस्तावित पर्यायी व्यवसाय (कृपया नमूद करा.) :- ------------------------------------

हाताने काम करणाऱ्या मेहतराचे नाव :- ------------------------------------

पत्ता :- ------------------------------------
------------------------------------
------------------------------------

पिनकोड :- ------------------------------------

संपर्क : दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक :- ------------------------------------

हाताने काम करणाऱ्या मेहतराची सही/ अंगठ्याचा ठसा

--------------------

नाव व दिनांक

आधारसामग्री नोंदणी कर्मचाऱ्याची सही (डाटाएन्ट्री ऑपरेटर)

--------------------

नाव व दिनांक ( सांकेताकासहीत)

प्रगणकाची सही/-

--------------------

नाव व दिनांक (संकेतांकासहित)

पर्यवेक्षकाची सही /-

--------------------

नाव व दिनांक (संकेतांकासहित)

## अनारोग्यकारी शौचालयाचा तपशील

१. व्यक्तिगत अनारोग्यकारी शौचालयांचा तपशील

| अ. क्र. | अनारोग्यकारी शौचालयाच्या मालकाचे नाव | ठिकाण | | हाताने काम करणा-या मेहतराचे मासिक वेतन / मजुरी (रुपये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | निर्जल शौचालय | ज्या शौचालयातून उघड्या नालीमध्ये मैला टाकला जातो अशा शौचालयाचे | रोख स्वरुपात | अन्नधान्य इत्यादी स्वरुपात |
| | | | | | |
| | | | | | |

हाताने काम करणाऱ्या मेहतराकडून स्वच्छ केल्या जाणा-या एकल अनारोग्यकारी शौचालयांची एकूण संख्या : ☐

(टीप : कृपया हाताने काम करणाऱ्या मेहतराकडून स्वच्छ केल्या जाणा-या एकल अनारोग्यकारी शौचालयांची तपशीलवार माहिती द्यावी. आपल्याला अधिक माहिती लिहिण्याची गरज वाटल्यास कृपया या पृष्ठाची फोटोकॉपी काढा व ती सर्वेक्षण नमुन्यासोबत जोडा.)

२. **सामूहिक अनारोग्यकारी शौचालयांचा तपशील** :-

| अ. क्र. | सामूहिक अनारोग्यकारी शौचालयाच्या मालकाचे नाव (संस्था / अभिकरण) | ठिकाण | | हाताने काम करणाऱ्या मेहतराचे मासिक वेतन / मजुरी (रुपये) | |
|---|---|---|---|---|---|
| | | निर्जल शौचालयाचे | ज्या शौचालयातून उघड्या नालीमध्ये मैला टाकला जातो अशा शौचालयाचे | रोख स्वरुपात | अन्नधान्य इत्यादी |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

## ३. उघड्या नाल्यांचा तपशील :

| अ. क्र. | ज्या उघड्या नाल्यांमध्ये अनारोग्यकारी शौचालयातील मैला सोडला जातो त्या उघड्या नाल्याचे ठिकाण | हाताने काम करणा-या मेहतरांचे मासिक वेतन / मजुरी (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | रोख स्वरुपात (रुपये) | वस्तू स्वरुपात (रुपये) |
| | | | |
| | | | |

(टीप : उघड्या नाल्यांमध्ये हाताने काम करणा-या मेहतरांची संख्या एका पेक्षा अधिक असल्यास कृपया हाताने काम करणाऱ्या प्रत्येक मेहतरांसाठी स्वतंत्र नमुना भरावा.)

(जोडपत्र-तीन)

**सर्वेक्षण समित्या : रचना व कार्ये**

| अ. क्र. | नगर स्तरीय सर्वेक्षण समिती | | | | जिल्हा स्तरीय सर्वेक्षण समिती | राज्य स्तरीय सर्वेक्षण समिती | राष्ट्रीय स्तरीय सर्वेक्षण समिती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | जेथे महानगपालिका आयुक्त हा, जिल्हा दंडाधिकाऱ्याच्या दर्जाहून उच्च दर्जाचा आहे अशी, महानगर पालिका असणारी शहरे | जिल्हा मुख्यालय असलेली शहरे | इतर शहरे | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | **रचना** | | | | | | |
| | (एक) अध्यक्ष | महानगरपालिका आयुक्त | जिल्हा दंडाधिकारी | उप-विभागीय दंडाधिकारी | जिल्हा दंडाधिकारी | राज्य शासनाने नाम निर्देशित केलेला अपर मुख्य सचिव किंवा प्रधान सचिव | सचिव, सामाजिक न्याय व अधिकारिता, मंत्रालय |
| | (दोन) सदस्य सचिव | स्थानिक संख्येचा मुख्य कार्यकारी अधिकारी | स्थानिक संख्येचा मुख्य कार्यकारी अधिकारी | स्थानिक संख्येचा मुख्य कार्यकारी अधिकारी | अनुसूचित जातीच्या संबंधातील कामकाज हाताळणारा जिल्हा स्तरीय अधिकारी | अपर मुख्य सचिव हा, अध्यक्ष असलेली समिती असेल तर अनुसूचित जाती संबंधातील कामकाज हाताळणारा प्रधान सचिव/ सचिव जर प्रधान सचिव अनुसूचित जातींचे कल्याण, हा | सहसचिव (एसटीडी) सामाजिक न्याय व अधिकारिता, मंत्रालय |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स्वतःच अध्यक्ष असेल त्यावेळी अनुसूचित जातीचे कल्याण | |
| | (तीन) सदस्य | - | - | - | (एक) जिल्हा सांख्यिकी अधिकारी | (एक) संचालक, आर्थिक व सांख्यिकी | (एक) सांख्यिकी व कार्यक्रम अमलबजावणी मंत्रालयाचा प्रतिनिधी |
| | - | - | - | - | - | - | (दोन) गृहनिर्माण व नागरी दारिद्रय निर्मुलन मंत्रालयाचा प्रतिनिधी |
| | | (एक) महानगरपालिकेचा प्रतिनिधी | (एक) नगरपालिका प्रतिनिधी | (एक) नगरपालिका निकायाचा प्रतिनिधी | (दोन) नगर विकास विभागाचा/ स्थानिक स्वराज्य विभागाचा जिल्हास्तरीय अधिकारी | (दोन) नगर विकास विभागाचा / स्थानिक स्वराज्य विभागाचा सचिव | (तीन) नगर विकास मंत्रालयाचा प्रतिनिधी |
| | - | - | - | - | - | (तीन) जनगणना कार्याचा / कार्यक्रमाचा प्रादेशिक संचालक | (चार) भारताचे महानिबंधक व जनगणना आयुक्त |
| | - | (दोन) रेल्वेचा * एक प्रतिनिधी | (दोन) रेल्वेचा * एक प्रतिनिधी | (दोन) रेल्वेचा * एक प्रतिनिधी | (तीन) रेल्वेचा * एक प्रतिनिधी | (चार) रेल्वेचा * एक प्रतिनिधी | (पाच) रेल्वेचा * एक प्रतिनिधी. (सहा) कटक मंडळाचा एक प्रतिनिधी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (तीन) हाताने काम करणारे मेहतर व सफाई कर्मचारी यांच्या कल्याणासाठी कार्य करणा-या अशासकीय संघटनांचे दोन प्रतिनिधी | (तीन) हाताने काम करणारे मेहतर व सफाई कर्मचारी यांच्या कल्याणासाठी कार्य करणा-या अशासकीय संघटनांचे दोन प्रतिनिधी | (तीन) हाताने काम करणारे मेहतर व सफाई कर्मचारी यांच्या कल्याणासाठी कार्य करणा-या अशासकीय संघटनांचे दोन प्रतिनिधी | (चार) हाताने काम करणारे मेहतर व सफाई कर्मचारी यांच्या कल्याणासाठी कार्य करणा-या अशासकीय संघटनांचे दोन प्रतिनिधी | (पाच) हाताने काम करणारे मेहतर व सफाई कर्मचारी यांच्या कल्याणासाठी कार्य करणा-या अशासकीय संघटनांचे दोन प्रतिनिधी | (सात) हाताने काम करणारे मेहतर व सफाई कर्मचारी यांच्या कल्याणासाठी कार्य करणा-या अशासकीय संघटनांचे दोन प्रतिनिधी |
| | | (चार) दोन समूह प्रतिनिधी ज्यांच्यापैकी एक महिला असावी. | (चार) दोन समूह प्रतिनिधी ज्यांच्यापैकी एक महिला असावी. | (चार) दोन समूह प्रतिनिधी ज्यांच्यापैकी एक महिला असावी. | (पाच) दोन समूह प्रतिनिधी ज्यांच्या पैकी एक महिला असावी. | (पाच) दोन समूह प्रतिनिधी ज्यांच्या पैकी एक महिला असावी. | (आठ) दोन समूह प्रतिनिधी ज्यांच्या पैकी एक महिला असावी. |
| **कार्ये** | | | | | | | |
| | | (एक) सर्वेक्षण योग्य प्रकारे व वेळेवर करण्याची सुनिश्चिती करणे. | (एक) सर्वेक्षण योग्य प्रकारे व वेळेवर करण्याची सुनिश्चिती करणे. | (एक) सर्वेक्षण योग्य प्रकारे व वेळेवर करण्याची सुनिश्चिती करणे. | (एक) जिल्हा स्तरावर सर्वेक्षण प्रक्रिया करणे व त्यावर देखरेख करणे. | (एक) राज्य स्तरावर हाताने काम करणा-या मेहतरांच्या सर्वेक्षणाच्या कामात समन्वय साधणे व त्यावर संनियंत्रण ठेवणे. | (एक) राष्ट्रीय स्तरावर हाताने काम करणा-या मेहतरांच्या सर्वेक्षणाच्या कामाचा समन्वय साधणे व त्यावर संनियंत्रण ठेवणे. |
| | - | - | - | - | - | (दोन) सामाजिक न्याय व अधिकारिता, मंत्रालयाकडून मिळालेल्या माध्यम | (दोन) मंत्रालय, माध्यम सामग्री तयार करील व राज्यांना / संघराज्य् क्षेत्रांना वितरित करील. |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | सामग्रीचा राज्ये / संघराज्य क्षेत्रे हे, स्थानिक भाषांत अनुवाद करतील. | |
| | - | - | - | - | (दोन) जिल्हे माध्यम सामग्रीचे शहरांना वितरण करतील. | (तीन) राज्ये/ संघराज्य क्षेत्रे माध्यम सामग्रीचे जिल्ह्यांना वितरण करतील. | - |
| | - | (दोन) हाताने काम करणा-या मेहतरांच्या सर्वेक्षणाविषयी स्थानिक वृत्तपत्रे, भित्तीपत्रके इत्यादी मार्फत स्थानिक स्तरावर प्रसिध्दीची व्यवस्था करणे. | (दोन) हाताने काम करणा-या मेहतरांच्या सर्वेक्षणाविषयी स्थानिक वृत्तपत्रे, भित्तीपत्रके इत्यादी मार्फत स्थानिक स्तरावर प्रसिध्दीची व्यवस्था करणे. | (दोन) हाताने काम करणा-या मेहतरांच्या सर्वेक्षणाविषयी स्थानिक वृत्तपत्रे, भित्तीपत्रके इत्यादी मार्फत स्थानिक स्तरावर प्रसिध्दीची व्यवस्था करणे. | (तीन) हाताने काम करणा-या मेहतरांच्या सर्वेक्षणाविषयी स्थानिक वृत्तपत्रे, भित्तीपत्रके इत्यादी मार्फत स्थानिक स्तरावर प्रसिध्दीची व्यवस्था करणे. | - | (तीन) मंत्रालय, राष्ट्रीय स्तरावर मुद्रण व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे माध्यम प्रचार मोहिम देखील सुरु करील. |
| | | (तीन) प्रगणकांना व पर्यवेक्षकांना अनुवादित सर्वेक्षण नमुने व सूचना माहिती पुस्तिका वितरीत करणे. | (तीन)प्रगणकांना व पर्यवेक्षकांना अनुवादित सर्वेक्षण नमुने व सूचना माहिती पुस्तिका वितरित करणे. | (तीन) प्रगणकांना व पर्यवेक्षकांना अनुवादित सर्वेक्षण नमुने व सूचना माहिती पुस्तिका वितरित करणे. | (चार) शहर स्तरीय सर्वेक्षण समितीला अनुवादित सर्वेक्षण सामग्रीचे वितरण करणे. | (चार)जिल्हास्तरीय सर्वेक्षण समितीला स्थानिक भाषेतील अनुवादीत सर्वेक्षण सामग्रीचे वितरण करणे. | (चार) राज्यांना /संघराज्य क्षेत्रांना सर्वेक्षण नमुने व सूचना माहिती पुस्तिका पाठविणे. |



एच-२७५०[५०००-३-१३]-१९

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | (चार) हाताने काम करणाऱ्या मेहतरांची मसुदा यादी तयार करणे | (चार) हाताने काम करणाऱ्या मेहतरांची मसुदा यादी तयार करणे | (चार) हाताने काम करणाऱ्या मेहतरांची मसुदा यादी तयार करणे | | | |
| | | (पाच) मसुदा यादीवरील दावे व आक्षेप मागविणे | (पाच) मसुदा यादीवरील दावे व आक्षेप मागविणे | (पाच) मसुदा यादीवरील दावे व आक्षेप मागविणे | | | |
| | | (सहा) दावे व आक्षेप निकाली काढणे | (सहा) दावे व आक्षेप निकाली काढणे | (सहा) दावे व आक्षेप निकाली काढणे | | | |
| | | | | | (पाच) जिल्ह्यातील सर्व नगर/ शहरांमधील मेहतरांच्या अंतिम यादीस मान्यता | | |
| | | (सात) अंतिम यादीचे प्रकाशन | (सात) अंतिम यादीचे प्रकाशन | (सात) अंतिम यादीचे प्रकाशन | (सहा) अंतिम यादीचे प्रकाशन | | |
| | | | | | | (पाच) राज्य सतरीय याद्यांचे संकलन | (पाच) राष्ट्रीय स्तरावरील सर्वेक्षण अहवालाचे प्रकाशन |

* केवळ रेल्वे असणाऱ्या नगरांनाच लागू.

*********

परिपत्रक क्र. सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे,
दिनांक ०४ मार्च, २०१३ सोबतचे सहपत्र

**परिशिष्ट- ड- १**

सन २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेच्या दरम्यान आढळून आलेले इन-सॅनिटरी लॅटरिन्स व त्यावर कार्यरत सफाई कामगारांचे सर्वेक्षणासाठी राज्यस्तर समिती

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| १ | श्री. श्रीकांत सिंह | प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग, मंत्रालय,<br>मुंबई-३२ | अध्यक्ष |
| २ | श्रीमती एस.एम. अपराजित | संचालक,<br>अर्थ व सांख्यिकी संचालनालय,<br>मुंबई | सदस्य |
| ३ | श्री.रणजितसिंह देओल | संचालक,<br>प्रादेशिक जनगणना संचालनालय,<br>महाराष्ट्र, मुंबई | सदस्य |
| ४ | श्री.सुबोध जैन | महाप्रबंधक<br>मध्य रेल्वे, मुंबई | सदस्य |
| ५ | श्री. वासुदेव चांगरे | अध्यक्ष,<br>उपेक्षित दलित समाज महासंघ,<br>सी-६, कादरी मंजिल, लालबहादूर शास्त्री मार्ग ,<br>शितल सिनेमाजवळ, कुर्ला (प.),<br>मुंबई-४०० ०७०. | सदस्य |
| ६ | श्री. गोविंदभाई परमार | अध्यक्ष,<br>मुंबई सफाई कामगार सेल ,<br>२ रा मजला , गाळा नं.-७९ ,<br>काकड इंडस्ट्रिलय इस्टेट,<br>टी.एच.कटारिया मार्ग, माटुंगा,<br>मुंबई- ४०० ०१६. | सदस्य |
| ७ | श्री. चरणसिंह टाक | प्रदेश अध्यक्ष,<br>अखिल भारतीय सफाई मजदुर कॉंग्रेस.<br>सफाई कामगार प्रतिनिधी (पुरुष) | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | श्रीमती माया वाघमारे | सफाई कामगार प्रतिनिधी (स्त्री)<br>गणेश नगर, बॅरेक नं. १८६१,<br>भाटीया हॉस्पिटल जवळ,<br>उल्हासनगर, कॅम्प नं. ५,<br>जिल्हा - ठाणे | सदस्य |
| ९ | श्री. आर.डी.शिंदे | सचिव,<br>सामाजिक न्याय व विशेष सहाय्य<br>विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य<br>सचिव |

********

परिपत्रक क्र. सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे
दिनांक ०४ मार्च, २०१३ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट- ड- २

सन २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेच्या दरम्यान आढळून आलेले इन-सॅनिटरी लॅटरिन्स व त्यावर कार्यरत सफाई कामगारांचे सर्वेक्षणासाठी जिल्हास्तर समिती

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| १ | श्री. | जिल्हाधिकारी, | अध्यक्ष |
| २ | श्री. | जिल्हा सांख्यिकी अधिकारी, मुंबई | सदस्य |
| ३ | श्री. | नगर पालिका प्रशासन विभागाचा जिल्हा स्तरावरील अधिकारी | सदस्य |
| ४ | श्री. | रेल्वे प्रतिनिधी (संबंधित असल्यास) | सदस्य |
| ५ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | श्री. | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (पुरुष) | सदस्य |
| ८ | श्रीमती | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (स्त्री) | सदस्य |
| ९ | श्री. | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, | सदस्य सचिव |

एच-२७५०[ ५०००-३-१३]-२१.

परिपत्रक क्र. सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे
दिनांक ०४ मार्च, २०१३ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट- ड- ३

सन २०११ च्या राष्ट्रीय जनगणनेच्या दरम्यान आढळून आलेले इन-सॅनिटरी लॅटरिन्स व त्यावर कार्यरत सफाई कामगारांचे सर्वेक्षणासाठी महानगरपालिका स्तर समिती

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| १ | श्री. | आयुक्त, महानगरपालिका. | अध्यक्ष |
| २ | श्री. | महानगरपालिका नगरसेवक | सदस्य |
| ३ | श्री. | रेल्वे प्रतिनिधी (संबंधित असल्यास) | सदस्य |
| ४ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | श्री. | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (पुरुष) | सदस्य |
| ७ | श्रीमती | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (स्त्री) | सदस्य |
| ८ | श्री. | सफाई/ मलनि:स्सारण विभागाचा अधिकारी | सदस्य सचिव |

परिपत्रक क्र. सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे
दिनांक ०४ मार्च, २०१३ सोबतचे सहपत्र

**परिशिष्ट-ड-४**

जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असलेल्या नगरपलिकेसाठी समिती.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| १ | श्री. | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | श्री. | नगरपालिका नगरसेवक | सदस्य |
| ३ | श्री. | रेल्वे प्रतिनिधी (संबंधित असल्यास) | सदस्य |
| ४ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | श्री. | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (पुरुष) | सदस्य |
| ७ | श्रीमती | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (स्त्री) | सदस्य |
| ८ | श्री. | मुख्य अधिकारी, नगरपालिका | सदस्य सचिव |

परिपत्रक क्र. सफाई-२०१३/प्र.क्र.२११/महामंडळे
दिनांक ०४ मार्च, २०१३ सोबतचे सहपत्र

## परिशिष्ट- ड- ५

जिल्हा मुख्यालया व्यतिरिक्त जिल्हयातील शहरासाठी सर्वेक्षण समिती.

| अ.क्र. | नाव | कार्यालय | पद |
|---|---|---|---|
| १ | श्री. | उप विभागीय अधिकारी | अध्यक्ष |
| २ | श्री. | नगरपालिका नगरसेवक | सदस्य |
| ३ | श्री. | रेल्वे प्रतिनिधी (संबंधित असल्यास) | सदस्य |
| ४ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | श्री. | सफाई कामगारांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या जिल्हयातील सेवाभावी संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | श्री. | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (पुरुष) | सदस्य |
| ७ | श्रीमती | सफाई काम करणा-या समाजाचे प्रतिनिधी (स्त्री) | सदस्य |
| ८ | श्री. | मुख्य अधिकारी, नगरपालिका | सदस्य सचिव |

--------